# सृजन

जुलै - नोव्हेंबर २०२२



महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## महाराष्ट्राचा विकासवृक्ष



## महानिर्मितीचे नूतन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांची नाशिक औ.वि. केंद्रास भेट









## महानिर्मितीचे तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचा निरोप समारंभ सोहळा संपन्न











महानिर्मितीचे तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचा निरोप समारंभ सोहळा नुकताच प्रकाशगड येथील सभागृहात संपन्न झाला. त्यावेळी महानिर्मितीचे नवनियुक्त मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प व संचलन) मा.श्री. संजय मारुडकर आणि महानिर्मितीचे सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक तसेच अन्य वरिष्ठ पुरुष-महिला अधिकारी, अभियंते-कर्मचारी उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.

# मनोगत



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

महानिर्मितीच्या परिवाराच्या प्रमुखपदाची सुत्रे हाती घेतल्यानंतरचा माझा हा आपणां सर्वांशी पहिलाच संवाद. महानिर्मितीच्या आजवरचा दैदिप्यमान इतिहास व विशेषत: कोविड काळापासून महानिर्मितीने केलेली विक्रमी कामगिरी लक्षात घेता, आगामी काळात अधिकाधिक उत्तम कामगिरी नोंदवून नवनवे विक्रम स्थापित करण्यासाठी देखील आपण सर्वजण योगदान द्याल, हा विश्वास वाटतो. वीजनिर्मिती हे खऱ्या अर्थाने समूहकार्य असून या कार्याद्वारे ग्राहकसेवेची पर्यायाने राज्याची-राष्ट्राची मौलिक सेवा करण्याची संधी आपल्याला मिळत असते.

सध्या अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत सौर प्रकल्प उभारणीचे धोरण सर्वत्र राबविले जात असल्याचे दिसते. महानिर्मितीने देखील काळाची बदलती पावले ओळखून सौर प्रकल्प उभारणीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेऊन आगामी ३-४ वर्षांत एकूण सुमारे ५,३३४ मेगावॅट इतक्या मोठ्या क्षमतेचे वेगवेगळ्या धर्तीवरचे सौर प्रकल्प उभारणीचे नियोजन सध्या केलेले आहे. तथापि, त्या दरम्यान महानिर्मितीचे बलस्थान असलेली औष्णिक वीजनिर्मिती ही पुढील किमान १० ते १५ वर्षांच्या कालावधीसाठी तरी फार महत्वाची ठरणार आहे. औष्णिक वीजनिर्मिती ही खऱ्या अर्थाने आजही सर्वात खात्रीशीर (Reliable) वीजनिर्मिती असल्याने आपल्याला क्षमतेनुसार जास्तीत जास्त औष्णिक वीजनिर्मितीकडे लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. राज्याची वाढीव विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी सध्या तरी औष्णिक वीजनिर्मितीला समर्थ पर्याय नाहीय, ही वस्तुस्थिती आहे. अर्थात, सौर प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वाढीव विजेचा यथायोग्य वापर साध्य करणेसाठी काही अन्य धोरणात्मक निर्णयदेखील घ्यावे लागतील. त्यासाठी जलसंपदा खात्याचे मार्फत पंप स्टोरेज पध्दतीची नवीन जलविद्युत केंद्रे उभारुन शिखर मागणीच्या कालावधीत रास्त दरात विजेच्या वाढीव मागणीची पूर्तता करता येईल का या दृष्टीने विचारविमर्श सुरु आहे. कारण स्वस्त दरातील सौर ऊर्जा वापरूनच पंप स्टोरेज जल विद्युत प्रकल्प व्यवहार्य ठरू शकतात. इलेक्ट्रिक वाहनांचा बोलबाला वाढत असताना व बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांकडून विजेवर आधारित उपकरणे फार मोठ्या प्रमाणावर वापरली जात असताना आपण सर्वांनी विजेच्या वाढत्या मागणीकडे केवळ आव्हान न समजता एक संधी म्हणून बघितले पाहिजे. या उत्पादनवाढीमुळे एकीकडे राष्ट्राची-राज्याची सेवा करत असताना महानिर्मितीची आर्थिक उन्नतीही साध्य होऊ शकते. अर्थात, यासाठी सर्वात महत्वाची बाब म्हणजे उपलब्ध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त अवलंब करुन औष्णिक वीजनिर्मिती ही सुरक्षित व पर्यावरणपूरक असली पाहिजे याकडे कटाक्ष हवा. त्यासाठी कर्बवायू उत्सर्जन व राखेची विल्हेवाट यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची कार्यपध्दती आपण अधिकाधिक काटेकोर करण्याची गरज भासते. हे करत असताना प्रामुख्याने कोळसासंबंधित दर्जा, पुरवठा प्रमाण व अन्य समस्या सोडविण्यासाठी आणखी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे असून उपलब्ध कोळशाचा महत्तम वापर करुन जास्तीत जास्त उष्मांक साध्य होण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी अधिक कार्यक्षम पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे.

येत्या काळात मी जास्तीत जास्त प्रमाणात वीजनिर्मिती केंद्रांना भेट देऊन तेथील कार्यपध्दती व समस्या समजावून घेणार आहे; परंतु, प्रत्येक विद्युत केंद्र हे कार्यक्षम, नीटनेटके, सुरक्षिततेचे व पर्यावरणाचे नियम पाळणारे असावे, ही माझी किमान अपेक्षा आहे.

या पहिल्या संवादात मी आपली एक महत्वाचा विचार आपणासोबत मांडत आहे, तो म्हणजे 'चाकोरीबाहेरचा विचार' करण्याची आवश्यकता. आपण वर्षानुवर्षे वीजनिर्मितीच्या कामात कार्यरत आहोत, तथापि अनुभव जास्त असला तरीही सतत नावीन्याचा ध्यास घेऊन 'चाकोरीबाहेरचा विचार' (Out of Box Thinking) केल्यास संशोधनात्मक वृत्तीला चालना मिळून अधिक उत्तम कार्यसंस्कृती रुजविण्यास मदत होईल. सुरक्षित-पर्यावरणपूरक वीजनिर्मिती रास्त दरात करुन मेरिट ऑर्डर डिस्पॅचच्या प्राधान्यक्रमात ती बसविणे हे एक मोठे आव्हान असून ते समर्थपणे पेलण्यासाठी अशा मनोवृत्तीची आता प्रकर्षाने गरज आहे. असे न झाल्यास वीजक्षेत्रातील वाढत्या स्पर्धेत महानिर्मितीच्या स्थानाला भविष्यात धक्का पोहोचण्याची शक्यता लक्षात घेऊन आपण सर्वांनी जोमाने कामाला लागले पाहिजे. गरे पालमा, सौर पार्क यांसारख्या काही जुन्या प्रलंबित प्रकल्पांना गती देण्याचा व पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न मी माझ्यापरीने करणार आहेच.

देशात मेसर्स. एन.टी.पी.सी. पाठोपाठ महानिर्मिती कंपनी ही दुसऱ्या क्रमांकाची वीजनिर्मिती कंपनी असली तरीही आता विशेष जोमाचे प्रयत्न कल्याखेरीज हे स्थान अबाधित राखणे दुरापास्त होणार आहे, याचे सामूहिक भान ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी आपणां सर्वांना एकत्रित व प्रामाणिक प्रयत्न करणे फार आवश्यक ठरणार आहे. बदलत्या काळाची व तंत्रज्ञानाची आव्हाने ओळखून आपल्याला पुढे वाटचाल करावी लागणार आहे. वीजनिर्मिती किंबहुना वीजक्षेत्र हे सेवाक्षेत्र आहे याचे भान ठेवताना आपण व्यावसायिक दृष्टीकोन ठेवत नसलो तरीही किमान व्यावहारिक दृष्टिकोन मात्र ठेवावा लागेल. कारण त्यायोगेच महानिर्मिती ही आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन अधिक उत्तम प्रकारे ग्राहकसेवा करु शकेल हा माझा विश्वास आहे.

भविष्याचा वेध घेत असताना नव्या उर्मीने ऊर्जावंत होऊन आपण महानिर्मितीला पुन्हा वैभवी भविष्याकडे नेण्याचा संकल्प करुयात...

**- डॉ. पी. अन्बलगन**

# स्वागत

## डॉ. पी. अन्बलगन यांनी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यभार स्वीकारला



दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या पदाचा कार्यभार मा.डॉ. पी. अन्बलगन (भा.प्र.से.) यांनी प्रकाशगड या मुख्यालय येथे स्वीकारला. यापूर्वी ते मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ या पदावर कार्यरत होते.

डॉ. पी. अन्बलगन हे उच्च विद्याविभूषित असून त्यांनी पशुवैद्यकीय विज्ञान शाखेमधून स्नातक शिक्षण तर हरियाणा येथील नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट येथून दुग्धव्यवसायात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. तसेच पुणे विद्यापीठातून त्यांचे नागरी आणि पर्यावरण तंत्रज्ञान या विषयात एम.टेक. तसेच पी.एच.डी. या पदवीसाठीचे संशोधन सुरू आहे.

महानिर्मितीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तसेच वीज ग्राहकांना रास्त दरात वीज उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. पी. अन्बलगन यांच्या शिक्षणाचा आणि अनुभवाचा नक्कीच चांगला उपयोग होणार आहे.

डॉ. पी. अन्बलगन हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या २००१ बॅचचे महाराष्ट्र केडरचे सनदी अधिकारी असून सन २००२ पासून त्यांनी महाराष्ट्र शासनामध्ये विविध जबाबदारीच्या पदांवर काम केले आहे.

सोलापूर जिल्ह्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी प्रशासकीय सेवेला सुरुवात केली. त्यानंतर कराडचे सहाय्यक जिल्हाधिकारी, नंदुरबार जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ., अहमदनगरचे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (MIDC) जॉईंट सी.ई.ओ., महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB)चे सदस्य सचिव आणि सी.ई.ओ. आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) येथे मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादी पदांवर त्यांनी यशस्वीरीत्या कार्यभार सांभाळला आहे.

डॉ. पी. अन्बलगन यांना प्रशासकीय सेवेतील दांडगा अनुभव आहे. २००२–०४ साली सोलापूर आणि कराड येथे कार्यरत असताना त्यांनी उत्तरमांड, वांग, महिंद, तारळी धरण पुनर्वसन कार्य, मुंबई–बंगलोर राष्ट्रीय महामार्गासाठी उंब्रज येथील वस्त्यांचे पुनर्वसन, २००४ साली कृष्णा आणि कोयना नदीवर आलेला पूर आला असताना पूर परिस्थिती यशस्वीरित्या हाताळली होती. तसेच नंदुरबार जिल्हा परिषद येथे सी.ई.ओ. पदावर कार्यरत असताना आरोग्याच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा, दुर्गम आदिवासी वस्त्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, अतिरिक्त १०२२ एकात्मिक बाल विकास सेवा केंद्रे बांधली, आय.सी.डी.एस. (ICDS) केंद्रांमुळे आदिवासी मुलांमधील कुपोषणात लक्षणीय घट झाली, दुर्गम आदिवासी खेड्यांमध्ये प्रसूतीसाठी मदत करण्यासाठी अनेक जीवनरक्षक मोहीमा राबवल्या, अहमदनगर येथे भूसंपादन प्रक्रियेचे संगणकीकरण करणे, यासारख्या विविध नवनवीन संकल्पना राबविल्या. कोरोना महामारीमध्ये लागू करण्यात आलेल्या देशव्यापी लॉकडाऊनमध्ये त्यांनी नागरिकांसाठी विशेषत: स्थलांतरित मजुरांना गावी परतण्यासाठी भरीव काम केल्याने त्यांना सन्मानित देखील करण्यात आलेले आहे.

## Sanjay Marudkar is appointed as Director (Projects) of MAHAGENCO



Sanjay Marudkar is appointed as Director (Projects) of MAHAGENCO. He is totally focused, innovative and result oriented with over 30 years' experience in Power Sector.

He has significant contributions in various areas of management of large sized Power Plants at different levels such as Operation and Maintenance, Project Planning, Execution and Monitoring, Renovation and Modernization of old units, Centralized procurement, Efficiency and System Improvements in Thermal Power Plants and thus delivering rapid results.

He is expertised in implementing process improvement initiative for enhancing overall organizational efficiency, proficiency in managing the business, ability to motivate subordinates in optimizing their performance levels and having excellent analytical, organizational and interpersonal skills.

He is having Bachelor of Engineering (Electrical) degree obatined in 1987 from Govt College of Engineering, Amravati, P.G. Diploma in Business Management in 1992 from Nagpur University, Diploma in Information Technology in the year 2000 from CEDTI Aurangabad. Further, he is Certified energy Auditor in 2005 from National Productivity Council- Bureau of Energy Efficiency, GoI

His career graph in power sector includes vast experience in major thermal plants of MSPGCL and over 5 years' of experience at Corporate office MSPGCL with various responsibilities in various departments such as of Projects Monitoring Group, Projects & Planning Department, Technical department, Central Purchase Agency plus Store Management, and Works Department.

He is successful in leading Bhusawal 1X660 MW project activities towards early completion of scheduled milestone until Covid – 19. He saved significant revenues by taking various initiatives in procurement process and had Lead a Team for performance demonstration during Hon. PM visit in Apr 2016 at 3x660MW Koradi TPS.

He has successfully commissioned the training simulator at KTPS and CSTPS and also successfully executed digital control system retrofit project for CSTPS-210 MW plant in record 40 days.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १७ वे (अंक ६)
जुलै - नोव्हेंबर २०२२

# Maharashtra State Power Generation Company Limited

## JULY - NOVEMBER - 2022

### संचालक मंडळ

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक : डॉ. पी. अन्बलगन (भाप्रसे)
संचालक : श्री. दिनेश वाघमारे (भाप्रसे)
संचालक (वित्त) : श्री. बाळासाहेब थिटे
संचालक (संचलन) (प्र) : श्री. संजय मारुडकर
संचालक (प्रकल्प) : श्री. संजय मारुडकर
संचालक (माईनिंग) : श्री. दिवाकर गोखले
संचालक : श्री. विश्वास पाठक
संचालक : स्वाती व्यवहारे

## अनुक्रमणिका

| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| माहीमचा चाचू | संजय कुळकर्णी | ३ |
| आकाशवाणी - एक आनंद यात्रा | नितीन जोगळेकर | ९ |
| पर्यावरण | राजेश लक्ष्मण वऱ्हाडे | ११ |
| आधुनिक काळातील भगीरथ | ज्योती हंकारे | १३ |
| हिरोती | डॉ. अतुल बनसोड | २३ |

### काव्यकुंज
१४ ते १६
**सहभाग :-** शालिग्राम साबे, प्रविण भोईर, राजेश पवार, राजेश वऱ्हाडे, डॉ. अतुल बनसोड आणि महेश आफळे

**सेवानिवृत्ती / निरोप** १२
**प्रतिक्रिया** १९

### प्रशासकीय वृत्त
**पृष्ठ क्र. : ५ ते ८, १० ते १२, १७ ते २८**

संपादक : **महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**मालकी**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.**
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

**श्री. महेश गोविंद आफळे** यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**

**The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

डिजिटल युगाचा सर्वत्र बोलबाला सुरु असताना सततच्या मनोरंजन – माहितीच्या भडिमारातही अजून टिकून राहिलेला 'सृजन' चा हा अंक आपणांसमोर सादर करताना मनात संमिश्र भावना आहे. अनेकदा अनेक पध्दतीने आवाहन करुनही क्षेत्रीय कार्यालयांकडून 'सृजन' साठी पुरेसा दर्जेदार मजकूर प्राप्त होणे कठीण झाले आहे. सुमारे १५ वर्षे मासिक स्वरुपात प्रसिध्द झालेला 'सृजन' नंतर गेल्या दोन–तीन वर्षांपासून 'द्वैमासिक' स्वरुपात प्रसिध्द होतोय. परंतु, आगामी काळात तो 'त्रैमासिक' म्हणून प्रसिध्द केला जाईल असे दिसते.

'सृजन' च्या आजवरच्या वाटचालीत अनेक नवनवीन उमेदीचे लेखक – कवी गवसले. त्या–त्या काळात या सर्वांनी आपापल्या परीने सरस्वती देवतेची – कलादेवतेची पूजा निश्चितच अगदी उत्तम प्रकारे केली. यांतील काहींची नंतर स्वतंत्र पुस्तके देखील प्रकाशित झाली आणि त्यांच्या एकूणच साहित्यिक जडणघडणीत – वाटचालीत 'सृजन' चा खारीचा का होईना, वाटा आहे याचा 'संपादक' या नात्याने आनंद आहे.

महानिर्मितीचे नूतन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी महानिर्मितीची सूत्रे नुकतीच स्वीकारली असून या अंकातून मनोगताद्वारे त्यांनी आपल्या उर्जावान कार्यशैलीचा प्रत्यय दिला आहे. नव्या जोमाने, नव्या उर्मीने आपण सर्वजण आपल्या कुटुंबप्रमुखांना साथ देऊयात आणि महानिर्मितीला पुन्हा एकदा गतवैभवाकडे नेऊयात!

या अंकात ललितलेखांचे तसेच तांत्रिकी स्वरुपाच्या लेखांचे प्रमाण आधीच्या तुलनेने कमी आहे. तथापि, हे लेखन आपणां सर्वांना आनंद देईल हा मात्र विश्वास आहे.

'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत 'उज्ज्वल भारत – उज्ज्वल भविष्य' या संकल्पनेत महानिर्मितीने सक्रिय सहभाग नोंदविला होता. राज्यभरात संपन्न झालेल्या या उपक्रमांत महानिर्मितीच्या सर्व वीजकेंद्रांनी दिलेल्या सहयोगाचे ऊर्जा विभागाकडून कौतुकदेखील करण्यात आले आहे. त्यातील काही कार्यक्रमांची छायाचित्रे अंकात समाविष्ट आहेत. अंकात विविध वीजकेंद्रातील प्रशासकीय वृत्त तसेच मुख्यालयातील अन्य उपक्रम यांचेही वृत्तांकन करण्यात आलेले आहे.

आपणां सर्वांना आगामी नववर्ष शुभेच्छा !सर्वांनी अंकाचा अवश्य आस्वाद घ्यावा, ही विनंती.

**– महेश आफळे**

# माहीमचा चाचू

**श्री संजय कुलकर्णी**
**कार्यकारी अभियंता, गट-२**
**(मध्यवर्ती खरेदी विभाग),**
**प्रकाशगड, मुंबई.**



मुंबई लोकल... आमची lifeline...जीवन रेषा... जगण्यासाठी आधार देताना अनेक अनामिक नात्यानं जोडणारी एक साखळी... एका वाचनात आलेल्या मुंबईच्या लोकल ट्रेनवरील कवितेच्या खालील ओळी लोकल ट्रेनचे अगदी समर्पक वर्णन करतात,

**"बस, टॅक्सी, कार सोडा विसरून जाल aeroplane,**
**अहो एकदा तरी अनुभवा आमच्या मुंबईची लोकल ट्रेन,**
**या लोकल ट्रेनमध्ये कोणते रंग नसतात,**
**संपूर्ण आयुष्याची चित्र इथे दिसतात,**
**रागीट डोळे लालेलाल, प्रेम गुलाबी हसरे गाल,**
**कोणामध्ये हिरवी माया, कोणामध्ये काळी छाया,**
**कोणाच्या डोळ्यात pleasure दिसते**
**तर कोणाच्या डोळ्यात pain,**
**एकदा तरी अनुभवा आमच्या मुंबईची लोकल ट्रेन"**

मार्च २०२० मध्ये covid मुळे लोकल प्रवासावर लावण्यात आलेले निर्बंध एका प्रदीर्घ कालावधीनंतर म्हणजे तब्बल २ वर्षांनी उठवण्यात आले आणि साधारणतः एप्रिल २०२२ पासून लोकल प्रवास विनाअट सर्व सामान्यांसाठी खुला करण्यात आला. लोकल प्रवास करण्यासाठी पुन्हा तिकीट खिडकीवर लांबच लांब रांगा दिसू लागल्या आणि स्टेशन्स व प्लॅटफॉर्म पुन्हा प्रवाश्यानी गजबजू लागले. या आधीच म्हटल्याप्रमाणे लोकल हा अनामिक नात्यांना जोडणारा एक दुवा आहे, एक साखळी आहे. रोज रोज एकाच मार्गावर एकाच वेळी एकाच गाडीने व एकाच डब्यात प्रवास करणारे अनेक आपणास भेटतील. जागेसाठी स्थानकात प्रवेश करणाऱ्या लोकल ट्रेनवर तुटून पडणाऱ्या मुंबईकरांचा आवेश गनिमांवर तुटून पडणाऱ्या मावळ्यांपेक्षा खचितही कमी नसतो. दादर, कुर्ला यांसारख्या स्थानकावर लोकलमधून उतरू इच्छिणाऱ्या प्रवाशांना उतरू न देता आग्रहाने पुढच्या स्थानकापर्यंत जबरदस्तीने नेणाऱ्या मुंबईकरांचे आदरतिथ्य निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. मात्र एकदा का जागेवर स्थिरावले की, मग मात्र रोज रोज दिसणारे चेहरे ओळखीचे होतात, हळूहळू चेहऱ्यावर हास्य फुलतात, नकळत अभिवादनासाठी हात वर जातात आणि रंगते गप्पाची मैफिल... नांव-गांव काहीच माहित नसते, मुळात गरजच नाही भासत हो, पण एक अनोळख्या दोस्तीची सुरवात मात्र झालेली असते. मग काय एकमेकास आलटून पालटून जागा देणे, बाकावर चौथी जागा निर्माण करणे इतपत माणुसकीची देवाणघेवाणही सुरु होते. कुठल्याही विषयावर गप्पा, चर्चा, गाणी, भजन इत्यादीच्या माध्यमातून जीवनाचे सारे तत्वज्ञान या प्रवासात आपणास प्राप्त होते.

मुंबई... कॉर्पोरेट नगरी, जबाबदाऱ्या मोठ्या, कामाचा तणाव प्रचंड, घरची मंडळी गावाकडे, त्यांची जबाबदारी, अपेक्षा पूर्तीचे ओझे, टार्गेट पूर्ण करण्याची ओढाताण ... मुंबईकरांचा जीव रोज अगदी मेटाकुटीला येतो, पण लोकल प्रवासातील ही अनामिक नातेवाईक मंडळी भेटताच क्षणभर का होईना सगळ्या शारीरिक व मानसिक तणावाचा विसर पडतो. जगण्याची नवी उमेद येते... उगाचच नाही लोकलला मुंबईकरांची लाईफलाईन म्हणत.

मात्र मार्च २०२० नंतर Covid च्या जीवघेण्या साथीमुळे ही सर्व नातेवाईक मंडळी अचानकपणे एकमेकांपासून दुरावली होती... नाती अनामिक ... ना कोणाचा मोबाईल नंबर, ना कोणाचा पत्ता, ना कोणाचे नाव माहिती... तरी ही नाती अतूट... थोडे अजब वाटते ना... पण खरे आहे... मायानगरीतील नाती बहुधा अशीच असावीत.

मी सुध्दा अर्थातच या लाईफलाईनचा एक भाग, या साखळीची एक कडी... वांद्रे येथे स्थित कार्यालयात जाण्यासाठी माझा लोकल प्रवास ठरलेला. वडाळा रोड स्थानकावरून सकाळी ९ वाजताची अंधेरी लोकल पकडून वांद्रे येथे जाणे हा माझा नित्यक्रम आणि याच प्रवासात साधारणतः ७० ते ७५ वर्षांचे असणारे एक वयोवृद्ध पण शारीरिकदृष्ट्या एकदम फिट असणारे एक सदगृहस्थ माझे अनामिक व अनोळखी मित्र झाले.

आयुष्यात आपल्याला अनेक व्यक्ती भेटतात, काही ठराविक वैशिष्ट्यांमुळे कायमस्वरूपी आपल्या स्मरणात राहतात. अशा व्यक्तींची एक छाप आपल्या मनावर कायमस्वरूपी उमटते आणि अशा व्यक्तींना एक टोपणनाव देणे हा माझा एक जगावेगळा छंद आहे. ते नाव मी त्या व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्याला अनुसरून किंवा काही ठराविक वेगळेपणामुळे त्या अनुरूप देत असतो आणि ही सर्व प्रक्रिया अत्यंत उत्स्फूर्त (sponteneous)असते. हे टोपणनाव अत्यंत गोपनीय व फक्त माझ्यापुरते मर्यादित असते, ते बाह्य जगाला ज्ञात नसते. असो, तर या माझ्या सवयीला किंवा छंदाला अनुसरून मी या

अनोळखी मित्राचे नाव ठेवले होते **माहीमचा चाचू.**

माझा प्रवास वडाळा रोड स्थानकापासून सुरु होत असे, चाचू मात्र आधीच्या स्थानकापासूनच ट्रेनमध्ये बसलेले असत. चाचू खिडकीजवळ, मधली जागा फक्त रिकामी आणि तिसऱ्या सीटवर नेहमीप्रमाणे बंबैय्या स्टाईल एक प्रवासी बसलेला. फर्स्ट क्लासच्या प्रवाशांची मोठी गंमत असते, एकवेळ उभे राहतील मात्र मधल्या सीटवर नाही बसणार. मी पण त्याला अपवाद नाही पण इतरत्र जागा नसल्याने मी मुकाट्याने चाचू शेजारी बसत असे आणि चाचू पटकन थोडे सरकून हसतमुखाने जागा करून देत. चाचूना माहीमला उतरायचे असल्याने मी सुध्दा थोडे मागे सरकून त्याना जाण्यासाठी जागा करून देत असे. चाचू उतरताना सुध्दा हसतमुखाने थँक यु म्हणत मार्गस्थ होत असत. ह्या प्रेमळ स्वभावामुळे चाचू पटकन माझे मित्र झाले व मी आवर्जून त्यांच्या शेजारी बसू लागलो. यामुळे नकळत माझ्या दिवसाची सुरुवातही चांगली होऊ लागली.

सर्व काही सुरळीत सुरु असताना अचानक Covid चे संकट उद्भवले आणि काही कळायच्या आधीच आपल्या देशात lockdown ची घोषणा झाली. सर्व व्यवहार, दळणवळण व वाहतूक पूर्णपणे बंद झाले व त्या अनुषंगाने मुंबईची लोकल सुद्धा. मी पण ३ महिने घरूनच म्हणजे वर्क फ्रॉम होम केले, मात्र नंतर जून २०२० पासून हळूहळू कार्यालय सुरु झाले. सुरुवातीला रिक्षाने प्रवास करत ऑफिसला जाऊ लागलो मात्र नंतर लवकरच लोकल प्रवासाची परवानगी मिळाली. पहिल्याच दिवशी वडाळा रोड स्थानकांतून लोकलमध्ये बसताना नकळत चाचूच्या सीटकडे नजर गेली, मात्र ते रिकामे होते. अर्थातच, लोकल प्रवास सामान्य जनतेसाठी खुला नसल्याने लोकल अर्थातच खूपच रिकामी होती. मात्र मी चाचूच्या आठवणी व स्नेहापोटी त्याच मधल्या सीटवर बसलो.

जवळ जवळ ६ महिन्यानंतर आज लोकल प्रवास करत होतो, एरव्ही मागील सहा महिन्यात चाचूची फारशी आठवण नव्हती आली. मात्र आज चाचूची रिकामी सीट प्रकर्षाने त्यांच्या अनुपस्थितीची जाणीव करून देत होती. सप्टेंबर २०२० चा तो महिना होता. माझे जीवन गाणे अविरत सुरु होते व त्या सोबत लोकल प्रवासही. लोकल प्रवासात चाचूची कमीही रोज जाणवत होती. Covid ची पहिली लाट ओसरल्यानंतर काळानंतरने दुसरी व तिसरीही लाट येऊन गेली. अजूनही लोकल प्रवासावरील निर्बंध कायम असल्याने अर्थातच चाचूची भेट अपेक्षित नव्हतीच.

Covid ची २री लाट अत्यंत जीवघेणी ठरली. औषधी, ऑक्सिजन व बेडची कमतरता यामुळे अनेक परिचितांना आपले प्राण गमवावे लागले. अनेक कटू अनुभव या काळात सगळ्यांना आले. औषधांचा काळाबाजार आणि हॉस्पिटलची आवाक्याबाहेरची बिलं यामुळे माणसाचा माणुसकीवरील विश्वास उडाला. मात्र या कठीण प्रसंगातही चाचूचे स्मितहास्य नकळत डोळ्यांपुढे यायचे आणि सर्व चांगले होईल हा विश्वास दृढ व्हायचा, मात्र एकदा अचानक वयोवृद्ध चाचूचे या जीवघेण्या संकटात काही बरेवाईट तर नाही ना झाले या विचाराने काळजात चर्रर झाले, पण पटकन मी तो वाईट विचार मनातून काढून टाकत चाचूच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी सिद्धिविनायकाला साकडे घातले... एका अनामिक अनोळखी मित्रासाठी... कुठलाही संवाद नाही साधे नाव सुद्धा माहित नाही पण जुळलेला ऋणानुबंध केवळ एका स्मितहास्यामुळे... ही सगळी मुंबईच्या लोकल ट्रेनची करामत, नुसतीच करामत नव्हे, तर या धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनातही लोकलने घडवलेले संस्कार म्हणू या आपण.

Covid ची २री व कालांतराने ३री लाट ओसरल्यानंतर मुंबईचे जीवन बऱ्यापैकी रुळावर आले होते. माझा नित्यक्रम पूर्वीसारखाच सुरु होता. चाचूची पुन्हा भेट होणार नाही असा विचार मनात आल्याने ते असतील तिथे सुखी राहोत, असा विचार करून व मनोमन त्यांना सदिच्छा देऊन मी मार्गक्रमण करत होतो. साधारणत: एप्रिल २०२२ ला लोकल प्रवासावरील सर्व निर्बंध उठवले गेले व ही लाईफलाईन पुन्हा भरगच्चं भरून वाहू लागली. असाच एके दिवशी मी वडाळा रोड स्थानकावरून लोकल मध्ये चढलो, जागेसाठी सर्वत्र नजर भिरभिरली आणि पाहतो तर काय साक्षात चाचू... हो चाचूच... वही अदा... वही अंदाज... आणि तीच जागा... खिडकीजवळची. क्षणभर विश्वास बसेना, पुन्हा डोळे विस्फारून पाहिले, हो... चाचूच... मनोमनी सिद्धीविनायकाला हात जोडून चाचू सुरक्षित असल्याने देवाचे आभार मानले. चटकन पुढे सरसावून मी चाचूच्या समोर गेलो. चाचूनी माझ्याकडे पाहिले आणि पुन्हा तेच प्रेमळ स्मित हास्य... मला पाहून झालेला आनंद चाचूच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत होता. त्यांनी पटकन हात वर करून मला अभिवादन केले... त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव जणू मला विचारत होते "कैसे हो बेटा... ?" तो अबोल आणि शब्दांविना झालेला संवाद माझ्या हृदयापर्यंत पोहोचला होता. मी सुद्धा चटकन माझा हात छातीजवळ नेऊन थोडे पुढे झुकून त्यांना मनोमन नमस्कार केला आणि मी मजेत आहे या अर्थी मान डोलावली. लोकलच्या गर्दीत चाचू जवळ जाऊन विचारपूस करणे शक्य नव्हते. पण माझ्या भावना चाचूंना पोहोचल्या, त्यांनी पुन्हा दोन्ही हात वर करून आशीर्वाद दिला. माहीम स्थानक आले व चाचू उतरण्यासाठी जागेवरून उठले. जाताना त्यांनी त्यांचा हात माझ्या खांद्यावर ठेऊन मला थोपटल्यासारखे करून पुन्हा आश्वस्त केले, त्यांच्या डबडबलेल्या डोळ्यातील प्रेमळ भावना मला प्रेमाचा, माणुसकीचा न आटणारा, न संपणारा ठेवा कायमस्वरूपी देऊन गेल्या. शब्दांविना झालेला हा संवाद, जीवनाचे तत्वज्ञान, जगण्याचा सार सांगून गेला... आजही माझा प्रवास सुरूच आहे... चाचू सोबत... संवादाविनाच... मात्र नव्या आत्मविश्वासाने, नव्या जोमाने, नव्या आशेने... आजही तीच लोकल, तीच सीट आणि तेच चाचू...

Covid च्या संकटानंतर पुन्हा नव्याने जगण्याची उभारी, उमेद... म्हणतात ना,

**नया कल चौखट पर है**
**आज उस पर एतबार कर,**
**कब तक बिते कल मे उलझेगा,**
**चल आज एक नई शुरुवात कर...**

******

## महानिर्मितीच्या कोराडी आणि खापरखेडा वीज केंद्रात १२ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना "संशोधन सहाय्यक" म्हणून संधी. महानिर्मिती राज्यभर ६० संशोधन सहाय्यकांना सहभागी करणार, व्ही.एन.आय.टी.नागपूर आणि महानिर्मिती यांच्यात सामंजस्य करार पदव्युत्तर, पदवी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना संशोधनासह अर्थार्जनाची सुवर्णसंधी

स्पेशलायझेशनच्या युगात नवनवीन संशोधने आणि सुधारणांना नेहमीच वाव असतो. वीज उत्पादनाच्या खडतर आणि अतिशय गुंतागुंतीच्या तांत्रिक स्वरूपाच्या कामात दैनंदिन समस्यांवर मात करण्यासाठी महानिर्मितीच्या २,१९० मेगावॅट क्षमतेच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्र आणि १,३४० मेगावाट क्षमतेच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने नुकतेच मध्य भारतातील सुप्रसिद्ध अश्या विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्थान (व्ही.एन.आय.टी.) नागपूर येथे पदव्युत्तर आणि पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना "संशोधन सहाय्यक" म्हणून सहभागी करून घेण्याबद्दल आज सामंजस्य करारावर(एम.ओ.यु.) स्वाक्षऱ्या केल्या.

सामंजस्य करारावर व्ही.एन.आय.टी. तर्फे संचालक प्रमोद पडोळे, डीन संशोधन व सल्लागार माधुरी चौधरी, मेकॅनिकल विभाग प्रमुख ठोंबरे, इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख विजय बोरघाटे तर महानिर्मितीच्या कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. अभय हरणे, खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे, उप महाव्यवस्थापक (मासं) डॉ. प्रकाश प्रभावत, कार्यकारी अभियंता श्री. विजय अढाव, अतिरिक्त जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, उप कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण बुटे, श्री. धनंजय दाणी प्रामुख्याने उपस्थित होते.

औष्णिक वीज उत्पादनाच्या दैनंदिन कार्यात मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इंस्ट्रुमेंटेशन, थर्मल इंजिनियरिंग, पॉवर इंजिनियरिंग, कम्प्युटर इंजिनियरिंग, सिव्हील इंजिनियरिंगसारख्या विविध अभियांत्रिकी संवर्गातील तांत्रिक कामांचा परस्पर संबंध असल्याने हे काम अतिशय जिकीरीचे आणि गुंतागुंतीचे आणि स्पेशलायझेशन स्वरूपाचे असते. दैनंदिन कामकाजाची तांत्रिक पद्धत जरी निश्चित असली तरी अनेकदा समस्या निर्माण होतात किंवा त्यामध्ये कालानुरूप सुधारणांची गरज असते. अत्याधुनिक तंत्रज्ञानात तरुण पिढी अग्रेसर असल्याने अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी ही सुवर्ण संधी आहे. यामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एक वर्ष प्रतिमाह २५ हजार रुपये प्रशिक्षण भत्ता, तर पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन महिने प्रतिमाह २० हजार रुपये प्रशिक्षण भत्ता देण्यात येणार आहे.

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी महानिर्मितीच्या औष्णिक, वायू, सौर, जल विद्युत केंद्र तसेच मुख्यालय मुंबईसाठी तरुण अभियंत्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागावी व सोबत अर्थार्जन व्हावे म्हणून "संशोधन सहाय्यक" या अभिनव योजनेला मान्यता दिली आहे. महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) मा.श्री. भीमाशंकर मंता यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरातील नागपूर, पुणे, औरंगाबाद, मुंबई, रायगड, चंद्रपूर, कराड, अमरावती आणि जळगाव अश्या ९ अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुमारे ६० विद्यार्थ्यांना "संशोधन सहाय्यक" म्हणून सहभागी करून ही योजना राबवली जाणार आहे. प्रशिक्षण कालावधी यशस्वी पूर्ण केल्यानंतर ह्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

संशोधन सहाय्यकाला वीज उत्पादनाच्या क्षेत्रातील उत्तम तांत्रिक कौशल्य, कमीत कमी संयंत्र वापर, प्रभावी मनुष्यबळ वापर, जल, वाफ, इंधन, वीज वापरात बचत, गुणवत्तापूर्ण अंकेक्षण, विश्लेषण, समस्येचे मूळ कारण शोधणे, जुन्या संचाचे नूतनीकरण व आधुनिकीकरण, राख आणि कोळसा दर्जा व्यवस्थापन, विश्लेषण, वीज उत्पादनात कार्यक्षमता वाढ, खर्चात काटकसर, पर्यावरण रक्षण, वातावरण बदल, अद्ययावत तंत्रज्ञान, अपारंपारिक उर्जा नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन, विकासात्मक अभ्यास आणि शिफारशी इत्यादींचा प्रकल्प अहवाल सादर करावा लागणार आहे.

## महानिर्मितीच्या छत्तीसगढ येथील गरे पालमा-२ प्रस्तावित कोळसा खाणीला पर्यावरण मंजुरी

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरण बदल मंत्रालयाने नुकतेच ११ जुलै रोजी महानिर्मितीच्या छत्तीसगढ येथील गरेपालमा-२ प्रस्तावित कोळसा खाणीला पर्यावरण मंजुरी दिली आहे.

सुमारे २,५८३.४८ हेक्टर परिसरातील या कोळसा ब्लॉकची क्षमता २२ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष खुल्या खदानीतून तर १.६ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष भूमिगत खदानीची आहे. रायगढ जिल्ह्यातील घरगोंडा तहसील अंतर्गत गरेपालमा-२ हा कोळसा ब्लॉक असून या खाणीतून कोळसा थेट रेल्वेमार्गे महानिर्मितीच्या चंद्रपूर, कोराडी आणि परळी वीज केंद्राला पाठविला जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने प्रत्येकी ५०० मेगावॅट क्षमतेच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र संच क्रमांक ८ व ९ (१,००० मेगावॅट), कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रत्येकी ६६० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक ८, ९ व १० (१,९८० मेगावॅट) आणि परळी औष्णिक विद्युत केंद्रातील २५० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक ८ (२५० मेगावॅट) असे एकूण ३,२३० मेगावॅट क्षमतेच्या वीज उत्पादनासाठी या कोळशाचा वापर होणार आहे. या प्रकल्पाद्वारे सुमारे ३,४०० रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या कोळसा प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणी सप्टेंबर २०१९ मध्ये झाली असून वन मंजुरी टप्पा-१ आणि पर्यावरण मंजुरी प्राप्त झाली असून आगामी तीन महिन्यांच्या कालावधीत वन मंजुरी टप्पा-२ अपेक्षित आहे. त्यानंतर जमीन अधिग्रहण प्रक्रियेला सुरुवात होणार असून साधारणतः सन २०२३ मध्ये प्रत्यक्ष खाण उत्खननास प्रारंभ होईल असे महानिर्मितीकडून सांगण्यात आले आहे.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथील कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

मा. मुख्य अभियंता कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी यांचेमार्फत स्प्रिंग स्कीन कॉस्मॅटॉलॉजी लेजर क्लिनिक खेड, चिपळूण यांचे विद्यमाने कोयना जल विद्युत केंद्र संकुलातील कार्यरत १२० कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणीचे शिबीर दि. १५ जून २०२२ रोजी आयोजित करण्यात आले. सदर शिबीर स्कीन कॉस्मॅटॉलॉजी लेजर क्लिनिक खेड, चिपळूण व अपरांत हॉस्पिटल चिपळूणच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर सौ. वैशाली जाधव व डॉक्टर भक्ती पालांडे यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळीतील एकूण १२० कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे या शिबीराचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन कोयना जल विद्युत केंद्र संकुलातील मुख्य अभियंता मा.श्री. चोपडे यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने झाले. या प्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रशासन) मा. कुंभार, अधीक्षक अभियंता मा. रेड्डी, अधीक्षक अभियंता मा. कोष्टी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. एम.एस. पवार, कल्याण अधिकारी श्री. निकम, तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी केलेल्या भाषणात अपरांत हॉस्पिटल चिपळूणच्या डॉक्टर सौ. वैशाली जाधव मॅडम यांनी 'आरोग्य तपासणी का करावी ? त्यामुळे आपल्याला कसा फायदा होतो ? व उद्भवणारे आजार वेळोवेळी केलेल्या आरोग्य आपण कसे कमी करू शकतो' हे विशद केले. आरोग्य तपासणीनंतरच्या मार्गदर्शनासाठी त्यांचे रुग्णालय सदैव तत्पर सेवा देईल अशी खात्री त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणात मुख्य अभियंता मा. श्री चोपडे यांनी आरोग्य तपासणीचे महत्व विशद करताना सर्वांना तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. आपल्या आरोग्याची काळजी कंपनी व्यवस्थापन करत असते. कर्मचारी शरीराने व मनाने निरोगी असेल तर तो कामही उत्तम करतो व त्याचा कंपनीला तसेच त्याच्या कुटुंबालाही फायदा होतो असे त्यांनी याप्रसंगी प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सूत्रसंचलन कोयना ज.वि. केंद्र संकुलातील टप्पा क्र. ४ चे कर्मचारी श्री. शिवाजीराव अलकुंटे यांनी अत्यंत सूत्रबद्धपणे व समर्पक शब्दात केले. सदर शिबीर यशस्वी करणेसाठी कोयना ज. वि. केंद्र, महानिर्मिती, दवाखान्यातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. एम.एस. पवार व त्यांच्या सर्व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात दिनांक ३१ मे २०२२ रोजी पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर त्यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

पारस औष्णिक विद्युत केंद्रातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने वृक्षारोपण व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उत्स्फूर्तरित्या सहभाग नोंदवून ५८ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले व त्यानंतर वृक्षारोपण तत्कालीन मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी मा. मुख्य अभियंता श्री. विठ्ठल खटारे, प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते श्री. धनंजय पंधाडे व श्री. संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार, कार्यकारी अभियंते श्री. सचिन डाखोळे व श्री संतोष केंडे, श्री. बालाजी अंबाड व व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. श्याम कल्याण गुंडरे, श्री. चेतन कावरे, डॉ. राजेश तायडे व इतर अधिकारी/कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. मयुर मेंढेकर कल्याण अधिकारी यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २८ मे २०२२ रोजी स्वातंत्रवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर त्यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी तत्कालीन मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. धनंजय पंधाडे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. निलय महाजन व अन्य अधिकारी / कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. मयुर मेंढेकर कल्याण अधिकारी यांनी केले.

## कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस श्री संजय जी चोपडे, मुख्य अभियंता, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंता श्री. राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे, कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. आर.एस. कल्याणी आणि कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी श्रीमती. माधुरी खाडीलकर, सहाय्यक अभियंता (आय.एस.ओ. विभाग) यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती संपन्न

दि. ३ ऑगस्ट २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंत साजरी करण्यात आली.

यावेळी या जयंती कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंता श्री. राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे, कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. रमाकांत कारंडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. डी.व्ही. पाटील आणि कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) सौ. स्नेहल नकाते यांनी या जयंत कार्यक्रमावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती संपन्न

परळी वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. ३ ऑगस्ट २०२२ रोजी क्रांतीसिंह नाना पाटील यांची १२२वी जयंती सकाळी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सर्वप्रथम प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतीसिंह नाना पाटील यांनी मोलाचे योगदान असल्याबाबतचे सांगितले.

याप्रसंगी श्री महेंद्र शिंदे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमास वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. आर.बी. पवार, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्री ए.एम. येरणे तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी यांनी तर आभार सौ. के.एच. गित्ते यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २३ जुलै २०२२ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

तसेच दिनांक १ ऑगस्ट २०२२ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती देखील साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरवातीस साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या दोन्ही कार्यक्रमप्रसंगी अध्यक्षस्थानी मा. मुख्य अभियंता श्री सुनील सोनपेठकर, प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते सर्वश्री. धनंजय पंधाडे, संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. निलय महाजन व इतर अधिकारी/कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या दोन्ही कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. मयुर मेंढेकर कल्याण अधिकारी यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपन्न

दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्रात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०२वी जयंती सकाळी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सर्वप्रथम प्रभारी मुख्य अभियंता श्री. डी.जी. इंगळे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. याप्रसंगी श्री. महेंद्र शिंदे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जीवनसंघर्ष नमूद करून मराठी साहित्यात मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. तसेच श्री. एच.के. अवचार यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत केलेल्या महत्वपूर्ण कार्याची सविस्तर माहिती सांगितली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी मुख्य अभियंता श्री. डी.जी. इंगळे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे विचार आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करावे असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार, श्री. एस.पी. राठोड, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. एन.के. चन्ने, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. आर.बी. पवार, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. ए.एम. येरणे तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. के.ए. गिते यांनी तर आभार कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

परळी औष्णिक विद्युत केंद्रात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची २९७ वी सार्वजनिक जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त दि. १६ ते ३१ मे २०२२ या कालावधीत अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त क्रिकेट सामने, कब्बडी, व्हॉलीबॉल, लहान मुलांसाठी व महिलांसाठी विविध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, ग्रुप डान्स, प्रश्नमंजुषा, चित्रकला, टॅलेंट शो, रांगोळी स्पर्धा, आनंद नगरी व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १६ ते २० मे २०२२ या कालावधीत क्रिकेटचे डे–नाईट सामने घेण्यात आले. दि. २५ ते २६ मे २०२२ या कालावधीत कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक २७ ते २८ मे २०२२ या कालावधीत व्हॉलीबॉल स्पर्धा घेण्यात आल्या. तर दि. २६ ते २८ मे २०२२ या कालावधीत रुबी क्युब स्पर्धा घेण्यात आल्या आणि यावेळी ओमसाई कापावार यांनी मुलांना प्रशिक्षण दिले.

दिनांक २७ ते २८ मे २०२२ या कालावधीत बुद्धीबळ स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक २८ मे २०२२ रोजी स्लो सायकल स्पर्धा, तसेच कशात काय पोत्यात पाय (थैला रेस), लहान मुलांचे व महिलांचे विविध कार्यक्रम स्पर्धा (उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची, अंताक्षरी) घेण्यात आले.

दिनांक २९ मे २०२२ रोजी चित्र रंगवा स्पर्धा, बलून गेम, संगीत खुर्ची, जिलेबी रेस, प्रश्न मंजुषा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक ३० मे २०२२ रोजी महिलांसाठी खेळ पैठणीचा, आनंद मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या सर्व स्पर्धामध्ये वसाहतीतील सर्व लहान मुले व रहिवाश्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दिनांक ३१ मे २०२२ रोजी शक्तीकुंज वसाहतीमधील खुल्या मैदानावर सकाळी ध्वजारोहण व प्रतिमा पूजनानंतर भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. त्यानंतर गोरगरिबांना तसेच रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. सायंकाळी डॉ. सुनिल धनगर यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले आणि त्यानंतर बक्षिस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दिनांक ३१ मे २०२२ रोजी सकाळी प्रशासकीय इमारतीतील सभागृहात जयंतीनिमित्त अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री. एम.पी. आव्हाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी उप मुख्य अभियंता श्री एच. के. अवचार, श्री एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री. डी.जी. इंगळे, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अरविंद यरणे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. एन.के. चन्ने, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष श्री. अरविंद येळे, सचिव श्री. विशाल गिरे, श्री. डी.एन. देवकते व इतर पदाधिकारी व सर्व विभागप्रमुख तसेच संघटना प्रतिनिधी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. महेंद्र शिंदे तर आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी यांनी केले.

## भुसावळ प्रकल्प (१×६६० मेगावॅट) येथे वृक्षारोपण उपक्रम राबवून जागतिक पर्यावरण दिवस संपन्न

जागतिक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधून महानिर्मितीच्या १×६६० मेगावॅट भुसावळ प्रकल्प येथे दिनांक ७ जून २०२२ रोजी वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन व पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागील मुख्य हेतू होता.

पर्यावरणाची हानी टाळली तर त्याचा फायदा मानव जातीलाच होईल तसेच पर्यावरण रक्षणासाठी भुसावळ प्रकल्प कटीबद्ध आहे व भुसावळ १×६६० मेगावॅट प्रकल्पाची उभारणी करीत असताना या प्रकल्पातून प्रदुषण होणार नाही यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे व कोणत्याही प्रकारचे प्रदूषण पकल्पातून होणार नाही अशी माहिती कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता (प्रकल्प) मा.श्री. विवेक रोकडे यांनी दिली. या प्रसंगी "आपला परिसर आणि परिसरातील पर्यावरण यांच्याशी निष्ठा राखण्याची" प्रतिज्ञा मुख्य अभियंता (प्रकल्प) मा.श्री. रोकडे यांनी भुसावळ प्रकल्पातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिली. भुसावळ प्रकल्प येथे जागतिक पर्यावरण दिवसाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे श्री. संजय अत्तरदे, पर्यावरण विभाग प्रमुख (कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव) हे लाभले. संयुक्त राष्ट्राचे पर्यावरण धोरण व पर्यावरण दिवस कशाकरिता साजरा केला जातो, तसेच या वर्षीचे पर्यावरणाचे घोषवाक्य "पृथ्वी एकच आहे" यावद्दल फारच अभ्यासपुर्ण माहिती त्यांनी दिली.

प्रत्येक घरी घनकचऱ्याची विल्हेवाट व उर्जा बचतीचे धडे हे प्रत्येकाच्या संस्कारात रूजविले पाहिजे असे मत उप मुख्य अभियंता श्री. मनोहर तायडे (स्थापत्य) यांनी मांडले. तसेच नैसर्गिक संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करून जीवन शैलीत बदल करण्याची गरज वेगवेगळ्या उदाहरणासहित अधीक्षक अभियंता श्री. मनिष बेडेकर (प्रकल्प) यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विद्युत केंद्रात प्रदुषण नियंत्रणाकरिता उपलब्ध संयंत्राची माहिती डॉ. राजेश चिव्हाणे, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ यांनी दिली. यावेळी श्री. महेश महाजन, उप–मुख्य अभियंता (प्रकल्प), श्री नंदकिशोर पांडे, उप महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री. किशोर शिरभय्ये, अधीक्षक अभियंता (चाचणी), श्री. योगेश इंगळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) तसेच भुसावळ प्रकल्प येथील स्थापत्य व प्रकल्पाचे सर्व कार्यकारी अभियंते, तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन श्री. हार्दिक सोनी यांनी केले.

# आकाशवाणी– एक आनंद यात्रा !!

**नितीन जोगळेकर,**
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता (कार्य विभाग),**
**मुख्यालय, मुंबई.**



**आ**काशातून सतत विहार करणाऱ्या लाखो ध्वनीलहरींच्या द्वारे आपल्या घरातील रेडिओ सेटमधून किंवा हातातील मोबाईलमधून सहजपणे ऐकता येणारी मधुर वाणी म्हणजेच आकाशवाणी! आकाशवाणी एक संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ आहे 'आकाशीय आवाज' भारतात रेडिओची सुरुवात १९२७ साली मुंबई आणि मद्रास या ठिकाणी झाली. मुंबई केंद्राचे पुढे १९३६ साली ऑल इंडिया रेडिओ असे नामकरण रुपांतर झाले आकाशवाणी असे नामकरण आणि देशभर प्रसारण सुरुवात १९५७ पासून झाली. तिचे ध्येयवाक्य आहे 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'. दिवसाचे २४ तास आकाशवाणी आपल्याला काय काय सुंदर ऐकवते पहा... सर्व भाषांमधून नियमित बातम्या, शेतकरी, कामगार, युवक युवती महिला, शालेय विद्यार्थी, यासाठी लोकोपयोगी प्रबोधन कार्यक्रम, नाटिका, मुलाखती, क्रीडा सामने, महत्वाचे प्रसंग यांचे धावते समालोचन आणि हजारोनी अवीट गोड गाणी... ज्यामध्ये भक्तीगीत, भावगीत, गजल, चित्रपटगीत, भजन, शास्त्रीय गायन आणि वाद्यवादन सर्व आहे, ज्यामुळे आपण सतत ताजेतवाने राहतो.

आकाशवाणीचा जन्म आमच्या बालपणी अगदी शालेय वयातच आकाशवाणीशी ओळख झाली आणि ती हळूहळू आणखी दृढ होत गेली. ओळखीतले एक शिक्षक रोज सकाळी नित्यनेमाने पहाटे उठून अंगणातली झाडलोट झाल्यावर ७ वाजता मस्त चहासोबत संस्कृत बातम्या ऐकायचे. 'इयं आकाशवाणी' पासून 'इति वार्ताह' आणि पाठोपाठ मराठी बातम्या. घराला घर लागून असल्याने सुस्वरातील या बातम्या आमच्याही कानावर पडायच्या. दुपारच्या वेळी शालेय कार्यक्रम मुलांना ऐकता यावेत म्हणून काही शिक्षक वर्गात चक्क रेडिओ घेऊन यायचे. सकाळी पहाटेची भक्तीगीते, रविवारची आपली आवड, संध्याकाळी युववाणी, रात्री भावगीते, नाटिका अशी मस्त रेलचेल असायची. क्रिकेटची मस्त कॉमेंट्री हिंदी आणि इंग्लिशमध्ये ऐकण्यासाठी लोक पानटपरी, हॉटेल्स चौकात उत्सुकतेने गर्दी करायचे. शाळा कॉलेजमध्ये सुद्धा काही विद्यार्थी छोटा रेडिओ खिशात ठेवायचे. ऑफिसेसमध्येही रिकाम्या वेळात लोकांचे स्कोअरकडे, चौकार, षटकार, विकेट पडणे याकडे लक्ष असायचे.

जेव्हा टी.व्ही. फार वापरात नव्हते तेव्हा नावाजलेल्या कंपनीचे विविध आकाराचे आणि रंगांचे अनेक आकर्षक रेडिओ सेट बाजारात मिळायचे आणि भेटवस्तू म्हणून दिले जायचे. त्याकाळी रेडिओसाठी पण परवाना जरुरी असे आणि त्याचे वार्षिक नूतनीकरण अनिवार्य होते.

रेडिओ ज्या गोष्टीसाठी अजूनही खूप लोकप्रिय आहे ती म्हणजे अगणित मधुर गाणी. साधारण प्रत्येक मोठ्या शहरात एकतरी आकाशवाणी केंद्र आहे. मुंबई, नागपूर, पुणे याठिकाणी जास्तच आहेत. आतातर आपल्या हातातील मोबाईल सेटमध्ये रेडिओचे app आहे ज्यामध्ये देशातील शेकडो रेडिओ स्टेशनवरचे कार्यक्रम ऐकणे शक्य झाले आहे .. अर्थात एकावेळी एकच !! सकाळी फक्त मराठी भक्तिगीते ऐकायची झाली तर रत्नागिरीपासून कोल्हापूर सातारामार्गे पुढे पुणे, औरंगाबाद, नाशिक, अकोला, यवतमाळ, बीड ते नागपूर, चंद्रपूरपर्यंत अर्ध्या तासात धावता महाराष्ट्र दौरा होतो. प्रवासात असा किंवा काही काम करत असताना अहोरात्र आपण रेडिओ कार्यक्रमांची पूर्ण मजा घेऊ शकतो.

अशीच एकदा कॉलेज काळात रेडिओ सिलोन वरच्या बिनाका गीतमालेशी ओळख झाली आणि दर बुधवारी रात्री सर्व कामे बाजूला आणि रेडिओजवळ ठेवून अमिन सयानी यांच्या भारदस्त आवाजात हिंदी पिक्चरच्या एकाहून एक गाण्यांच्या स्पर्धेची झिंग अनुभवणे सुरु झाले. नोकरीची सुरुवातीची वर्षे कोयना संकुलात पोफळीसारख्या दुर्गम भागात गेल्यामुळे आकाशवाणी ऐकण्यात मोठा खंड पडला. पण नंतर तब्बल १ वर्ष प्रशिक्षण निमित्ताने कोराडी, नागपूर इथे व्यतीत झाल्यामुळे त्या भागातील रेडिओ कार्यक्रमांची मांदियाळी अनुभवता आली. त्यातून मग आवडती गाणी कॅसेटवर रेकॉर्ड करून ठेवण्याची आणि पुन:पुन्हा ऐकण्याची सवयच लागली.

नाशिक आणि मुंबई आकाशवाणी केंद्र पाहण्याचा योग आला. उत्तमोत्तम माहिती, संगीत याचा खूप मोठा खजिना आकाशवाणीकडे आहे आणि त्यात दिवसेंदिवस आणखी भर पडत आहे. तिथले तंत्रज्ञ, निवेदक, कलाकार, कर्मचारी हे सतत काहीनाकाही उत्तम श्रवणीय, उद्बोधक साहित्य सामान्य जनापर्यंत कसे पोहोचवता येईल यासाठी कार्यरत असतात. त्यामुळे आपली सकाळ ते रात्र... पूर्ण दिवस उत्साहपूर्ण आणि मनोरंजक होतो. सध्याच्या मोबाईल, whatsapp युगातही आकाशवाणीने आपले अढळ स्थान टिकवून ठेवले आहे. रोजचा दिवस सकाळी चहासोबत बातम्यांनी सुरु होतो आणि रात्री मधुर संगीत ऐकता ऐकता झोप आल्यावर उशाशी ठेवलेल्या रेडिओचे बटन अलगद बंद करून संपतो !

******

# नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचा ५२वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे ५२वे वर्ष यशस्वीरित्या पूर्ण करून मंगळवार दिनांक १६ ऑगस्ट २०२२ रोजी ५३व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त वीज केंद्रामध्ये सकाळी द्वारपूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीज केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे उपस्थित होते. तसेच सोबत उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, अधीक्षक अभियंता श्री. शशांक चव्हाण, श्री. प्रविण गोसावी व श्री. अभिजीत आहेर आणि कार्यकारी अभियंता श्री. देशमुख, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. एस.जी. पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. केशव मारूती नरवाड, सहाय्यक अभियंता श्री. ललित आल्हाट, प्रभारी कल्याण अधिकारी श्री. अनिल कांबळे यांचेसह वीज केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारीवृंद, संयुक्त कृती समिती, सर्व संघटना पदाधिकारी, कंत्राटदार व कंत्राटी कामगार तसेच नाशिक औ.वि. केंद्राचे कॉन्ट्रक्टर असोसिएशनचे अध्यक्ष सचिव / सर्व सदस्य इत्यादी उपस्थित होते.

या प्रसंगी वीज केंद्राचे सुरक्षा प्रवेशद्वाराचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे गुलाब पुष्प देवून उत्सव समितीद्वारे स्वागत करण्यात आले. तद्नंतर मान्यवरांच्या हस्ते द्वारपूजन करून श्रीफळ वाढविण्यात आले. कोरोना (कोव्हिड-१९) च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारीवृंद, यानंतर सुरक्षा प्रवेशद्वाराचे फित कापून द्वारप्रवेश करण्यात आला.

तद्नंतर सर्व मान्यवर टप्पा क्र. २ येथे जलप्रकिया विभागाचे कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. एस.जी. पाटील सहपत्नीक सत्यनारायण पूजन केले. अत्यंत आकर्षक सजावटीसह प्रवेशद्वारासमोर सुबक अशी अमृतमहोत्सव ५२वा वर्धापन दिन २०२२ प्रतिमा असलेली सौ. वैशाली नंदनवार यांनी रेखाटली. मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी कार्यक्रमादरम्यान सामाजिक अंतर पाळून योग्य ती दक्षता घेतली. प्रवेशद्वाराजवळ उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून आंतरगृह स्पर्धा (टेबल टेनिस, चेरा, कॅरम, डमिंटन) इत्यादी खेळ संपन्न झाले.
या खेळामध्ये नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे अधिकारी, कर्मचारी व महिलावर्ग यांनी हिरिरीने सहभाग घेतला व विजेत्यांना मेडल, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान वीज केंद्राचे मुख्य अभियंता यांनी ५२व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारीवृंद, संघटना प्रतिनिधी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार यांना पुनश्च वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच वीज केंद्राशी निगडीत तांत्रिक घटकांवर प्रकाश टाकला. आजपर्यंत नाशिक औष्णिक विद्युत केंद्राने विविध पुरस्कार प्राप्त केले त्याकरिता सर्वांचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच स्वरूपाचे प्रगतीचा चढता आलेख ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. सारंग येवले वर्धापन दिनांच्या कार्यक्रमाचे नियोजन करून प्रास्ताविकासह समिती सदस्य यांचे सोबत योग्य तो समन्वय साधून कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली. आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. अनिल कांबळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्धापन दिन उत्सव समितीचे सदस्य कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. एस.जी. पाटील, सर्वश्री. एल.डी. आल्हाट, किरण दिंडे, सी.एल. थोटे, प्रभाकर रेवगडे, संग्राम भालेराव, मोमिन इम्तियाज, महेश ठाकरके, शशिकांत पवार, शशांक केशरखाने, पांडुरंग कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर वर्धापन दिन कोरोना (कोव्हिड - १९) च्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर पाळून घेण्यात आला.

तसेच सदर वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दिनांक १९ ऑगस्ट २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे दवाखाना येथे 'अशोका मेडिकेअर हॉस्पिटल' यांचेद्वारे वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाकरिता नाशिक औ.वि. केंद्राचे उप मुख्य अभियंता (संवसु) श्री. बाबासाहेब पाटील, यांच्या हस्ते डॉ. श्री. राजवर्धन शेळके व डॉ. कांचन भांबरे, यांना पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. तद्नंतर डॉ. कांचन भांबरे यांनी सुदृढ आरोग्याविषयी माहिती दिली. तसेच आपले दैनंदिन आहाराविषयी आपण कसे नियोजन करावे हे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, श्री. आहेर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रविण मावळे, व प्रभारी कल्याण अधिकारी श्री. अनिल कांबळे, तसेच सर्व अधिकारी / अभियंते / कर्मचारीवृंद व महिला वर्ग मोठ्या संख्येत उपस्थित होते.

शिबिराचे आयोजन व नियोजन वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रविण मावळे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान सर्व अधिकारी/अभियंते/ कर्मचारीवृंद, कामगार व वसाहतवासीय, कंत्राटदार यांनी शिबिराचा प्रतिसाद घेतला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सौ. दिपाली चौधरी यांनी केले.

# पर्यावरण

– राजेश लक्ष्मण वऱ्हाडे,
एम.आय.एस. विभाग,
पारस औ.वि. केंद्र.



पर्यावरण... पर्यावरण म्हणजे काय तर जीवसृष्टी निर्मितीसोबत निर्माण झालेली झाडे वेली, फळ, फुले देणारी अन्नधान्य पिकवून मानवाच्या उदरनिर्वाहासाठी माध्यम. कारण मानवाला लागणारी हवा बाष्पीभवन होऊन येणारे पाणी जगण्यासाठी आवश्यक आहे. पशु-पक्ष्यांचाही आहार-विहार त्यावरच अवलंबून आहेत. सर्वात आधी येणारे फळ पक्व झाले का नाही ते त्यांनाच विचारा म्हणजे ते खातात त्यावरून आपल्याला कळते.

ही सृष्टी खूप मोठी आहे. मानवाच्या उपयोगाचे वापरायची जरूर अधिकार, परंतु स्व स्वार्थासाठी मानवाने तिचा घात करायला सुरुवात केली. वृक्षतोड होऊ लागली. पडीक वनक्षेत्र शेती पेरणीकरिता तयार करू लागला. तसेच राहण्यासाठी उंच उंच इमारती बनवू लागला. दळणवळणाच्या साधनासाठी रस्ते बांधकामात आलेली झाडे वृक्षतोड करू लागला. कॉंक्रीट डांबरीकरण, रस्ते निर्मिती झाली व शेतीसाठी सरकारी नियमानुसार वाहीन त्याची शेती, पडीक जमिनीवर पैसे देऊन मालकी हक्क तयार झाले. वन्यप्राणी झाडावर चढून त्रास देतात म्हणून झाडे कत्तल झाली. कालांतराने कमीतकमी प्रमाणात पाऊस होऊ लागला व त्यामुळे उत्पादनही कमी व्हायला लागले. परिणामी काही सेवाभावी संस्था, सरकारी यंत्रणा दुष्काळामुळे खडबडून जागे झाले व वृक्ष लागवड मोहीम जोपासना करणे हाती घेऊ लागले. कुठे काही जयंती, उद्‌घाटन किंवा नंतर वाढदिवसही वृक्षारोपण करून साजरी करू लागले, म्हणजेच मानवाला त्याची महती कळली.

गेल्या दोन वर्षापासून लोळवणारा कोरोना प्राणवायू संपला. जागोजागी ऑक्सिजन प्लांट उभारावे लागले. प्राणवायूची महती कळली, रस्त्याच्या कडेला जागोजागी "झाडे लावा, झाडे जगवा" घोषवाक्य घुमू लागले. "पाणी अडवा, पाणी जिरवा" कारण पाऊस हा बाष्पीभवन वाऱ्यावर अवलंबून आहे. चला तर मग प्रतिज्ञा करू, एक झाड काही कारणास्तव तोडायचे असेल तर दहा झाडे जगवू वाढवून दाखवू, हेच आपल्या सर्वांच्या हिताचे आहे.

******

**पर्यावरण घोषवाक्य :-**

१. होता वृक्षतोड पर्यावरणाचा ऱ्हास,
प्राणवायू अन्नपाणी संपता यमाचा हो घास.

२. मानवासाठी सुंदर पर्यावरण निर्मितीची,
जोपासना करून करावी मित्र संगती.

३. पर्यावरण संवर्धनाकरिता मानवा सदा,
प्राणवायू फळे-फुले, अन्न मिटेल आपदा.

४. पर्यावरण जोपासना मानवा उद्देश खरा,
सुंदर, छान हवा, सदा नैसर्गिक संपत्ती आसरा.

५. पर्यावरणाशी करावी सदैव पदोपदी मित्रता,
मिळेल नैसर्गिक वायू शुद्ध पर्याप्त घेता.

६. का करतोस, जाणून पर्यावरणाचा होतो भक्षक,
प्राणवायू संपता डॉक्टर नाईलाज म्हणतील रक्षक.

प्रशासकीय वृत्त

## कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे वसंतराव नाईक यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. ०१ जुलै २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी या कार्यक्रमास श्री आर.के. कुंभार - अधीक्षक अभियंता (प्रशासन), श्री. राजीव रेड्डी - अधीक्षक अभियंता, श्री. विजय देसाई - सहाय्यक महाव्यवस्थापक, श्री. एम.एन. फडतरे - वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा), श्री. एस.बी. शिर्के - उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा), श्री. प्रसाद निकम - कल्याण अधिकारी आणि कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. सौ. स्नेहल नकाते - अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) यांनी या जयंती कार्यक्रमावेळी वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## खापरखेडा औ.वि. केंद्रातील कंत्राटी कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना रुग्णालय (ESIC) तर्फे मोफत आरोग्य तपासणी व रोग निदान शिबीर संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. १६ जून २०२२ रोजी ४० वर्षांवरील कंत्राटी कामगार यांच्याकरिता मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कामगार विमा योजना रुग्णालय (ESIC), सोमवार पेठ, नागपूर महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे एकूण ३०० कंत्राटी कामगारांची मोफत आरोग्य तपासणी व रोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्य अभियंता श्री. शरद भगत यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात योग प्रशिक्षक आकांक्षा नारनवरे व डॉ. हर्षवर्धन कांबळे – वैद्यकीय अधिकारी यांच्याव्दारे सर्व उपस्थित कंत्राटी कामगारांना दैनंदिन जीवनात सुदृढ आरोग्याकरिता योगाचे महत्व, मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी एकूण ३०० कंत्राटी कामगारांची नेत्र रोग तपासणी, रक्त तपासणी, हृदय रोग तपासणी, रक्त दाब तपासणी, ECG, अस्थी रोग तपासणी व रोग निदान करण्यात आले.

सदर आरोग्य तपासणीकरिता राज्य कामगार विमा योजना रुग्णालय (ESIC) यांच्यातर्फे डॉ. हर्षवर्धन कांबळे (वैद्यकीय अधिकारी), डॉ. आनंद नाईक (हृदयरोग तज्ञ), डॉ. विवेक साठे (अस्थीरोग तज्ञ), डॉ. सोनाली कांबळे (नेत्ररोग तज्ञ) यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सदर आरोग्य तपासणी शिबिरात कार्यक्रमासाठी श्री. अरूण पेटकर (उपमुख्य अभियंता–२), श्री. जितेंद्र टेंभरे (उपमुख्य अभियंता प्रशासन), श्री. अनिल काठोये (अधीक्षक अभियंता), श्री. संजीवकुमार पखान (अधीक्षक अभियंता), श्री. संजय तायडे (अधीक्षक अभियंता), श्री. विश्वास सोमकुवर (अधीक्षक अभियंता), श्री. संदीप देवगडे (अधीक्षक अभियंता), श्री. अमित ग्वालवंशी (वैद्यकीय अधीक्षक), श्री. उमेश ढोक (सुरक्षितता अधिकारी), डॉ. कुणाल बावणे (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी), डॉ. अतुल दांदळे (रुग्णालय प्रशासक) या समवेत मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रामुख्याने कंत्राटी कामगार संघटना प्रतिनिधी श्री. रोशन गोस्वामी, श्री. भूपेंद्र चतुर्वेदी, श्री. विनोद बनसोड, श्री. उमेश पारधी इत्यादींनी सहकार्य केले.

सदर कार्यक्रम हा औद्योगिक संबंध विभाग (LIR) च्या वतीने आयोजित करण्यात आला व कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार श्री. अमरजीत गोडबोले, प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) यांनी केले.

सेवानिवृत्ती

## आम्ही आपले आभारी आहोत

**कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथील सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी :-**

**मे २०२२ :-**

(१) श्री. बाबासाहेब रावसाहेब पाटील – कार्यकारी अभियंता, (२) श्री. बापुराव पांडुरंग देशमुख – उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. अब्दुल कय्युम इस्माईल नाईक – उप कार्यकारी अभियंता, (४) श्री. विजय सखाराम चव्हाण – तंत्रज्ञ – १, (५) श्री. महारूद्र विठ्ठल चव्हाण – तंत्रज्ञ – १.

**जून २०२२ :-**

(१) श्री. रविंद्र चंद्रहास क्षिरसागर – उप कार्य. अभियंता, (२) श्री. प्रदिप शंकर मुरूमकर – सहाय्यक अभियंता, (३) श्री. सतिश पांडुरंग दळवी – तंत्रज्ञ १, (४) श्री. सुरेश रावजी कांगणे – शिपाई.

**ऑगस्ट २०२२ :-**

(१) श्री. भागवत जगन्नाथ कातोरे – उप कार्यकारी अभियंता, (२) सौ. शारदा सुरेश जाधव – टंकलेखिका.

## पारस औष्णिक विद्युत केंद्राकडून "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत ऊर्जा सप्ताह संपन्न

"आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत केंद्रीय ऊर्जा विभागाद्वारे दिनांक २५ जुलै ते ३१ जुलै २०२२ या कालावधीत "उज्ज्वल भारत उज्जल भविष्य" या संकल्पनेत उर्जा सप्ताह राबविण्यात आला. सदर आयोजित कार्यक्रमात पारस औष्णिक विद्युत केंद्राकडून महानिर्मिती कंपनीचे प्रतिनिधित्व करण्यात आले.

सदर कार्यक्रम जिल्हास्तरीय राबविण्यात आला असून महानिर्मिती कंपनीचे प्रतिनिधित्व करण्यास पारस औष्णिक केंद्राला बुलढाणा, अमरावती व अकोला या तीन विभागाची जबाबदारी देण्यात आली. सदर कार्यक्रमा अंतर्गत पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी श्री. संजय कांबळे (अधीक्षक अभियंता) यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली.

सदर कार्यक्रमाची अंमलबजावणीकरिता श्री. संजय कांबळे (अधीक्षक अभियंता) यांच्या नेतृत्वाखाली चमू नियोजित करण्यात आल त्यामध्ये कार्यरत कर्मचारी सहाय्यक अभियंता श्री. पंकज खोंड, कनिष्ठ अभियंता श्री. सुनील सुरशे, कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर आणि कंत्राटी कामगार श्री. अनवरउद्दीन कामोद्दिन अन्सारी यांचेद्वारे विविध नियोजित ठिकाणी महानिर्मिती कंपनीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची माहिती देणारी पत्रके त्या–त्या कार्यक्रमात उपस्थित पाहुणे, जनसमुदायास देण्यात आली.

# आधुनिक काळातील भगीरथ...

- ज्योती अमित हंकारे
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (प्रकल्प व नियोजन), मुख्यालय, मुंबई.**



**(मुख्यालय 'प्रकाशगड' येथील अभियंता दिनाच्या कार्यक्रमात केलेले प्रास्ताविक)**

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या १५ सप्टेंबर म्हणजेच "अभियंता दिवस" देशाच्या उभारणीत महत्त्वपूर्ण सहभाग असलेले ख्यातनाम अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचा हा जन्म दिवस. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या म्हणजेच सर एम.व्ही. यांनी आयुष्यभर देशाच्या विकासालाच सर्वोच्च प्राधान्य दिले. भारतीय संस्कृतीचे, सहकार्याचे आणि कार्यकौशल्याचे प्रतीक म्हणजे सर एम. व्ही...

त्यांच्या कार्याला मानवंदना देण्यासाठी आणि त्यांच्यासारख्या अभियंत्याच्या योगदानाचा गौरव म्हणून १५ सप्टेंबर हा सर एम. व्ही. चा जन्मदिवस सर्वत्र "राष्ट्रीय अभियंता दिन" म्हणून साजरा केला जातो. केवळ भारतातच नव्हे तर श्रीलंका, टांझानिआ या देशांतही हा दिवस साजरा केला जातो. सहाय्यक अभियंता ते भारतरत्न हा सर विश्वेश्वरैय्या यांचा अद्भुत प्रवास साधी राहणी व उच्च विचारसरणी हे तत्त्व अधोरेखित करतो. तर अशा या "आधुनिक काळातील भगीरथ" अशी उपाधी सार्थ करणाऱ्या सर विश्वेश्वरैय्या यांच्या प्रेरणादायी जीवन प्रवासाबद्दल मी इथे थोडी माहिती देत आहे.

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या म्हणजे अभियांत्रिकी, पाणी व्यवस्थापन, सिंचन व्यवस्थापन औद्योगिकीकरण व शिक्षण व्यवस्थापनातील एक अलौकिक असे व्यक्तिमत्त्व! त्यांचा जन्म दि. १५ सप्टेंबर १८६० रोजी म्हैसुर प्रांतातील मुदेनाहल्ली या गावात झाला. त्यांचे वडील पंडित श्रीनिवास शास्त्री वेदविद्येचे प्रकांड पंडित व आयुर्वेदतज्ञ होते. असेच एकदा शास्त्रीजी गंगावतरणाची गोष्ट सांगत होते. सात-आठ वर्षांच्या विश्वेश्वरैय्याच्या मनात या गोष्टीने घर केले. भगीरथाच्या प्रयत्नाने गंगा पृथ्वीवर आली, ही गोष्ट त्याने आपल्यासाठी आदर्श मानली. ज्ञान आत्मविश्वास आणि साधनेच्या बळावर माणूस एखादया नदीची दिशा बदलू शकतो, गंगेला भागीरथी बनवू शकतो, हे त्यांना कळले. १८८३ मध्ये Engineer होऊन सहाय्यक अभियंता या पदावरून त्यांनी श्रीगणेशा केला.

सर एम. व्ही. पुण्याच्या खडकवासला धरणाचे अभियंता असतानाची एक गोष्ट आहे. त्याकाळी पुण्यामध्ये पाण्याची फार टंचाई होती. धरणासाठी Automatic Gate System म्हणजेच स्वयंचलित दरवाजे हा एकमेव पर्याय होता पण ग्रामीण भागात विजेशिवाय स्वयंचलित दरवाजे ही कल्पना म्हणजे अशक्य कोटीतील गोष्ट होती; मात्र सर एम.व्हीं. नी विज्ञानाच्या नियमांचा केवळ अभ्यासच केला नव्हता, तर ते नियम आपल्या रोजच्या जीवनात उतरवले होते. हे वर्णन ऐकून आपल्याला 3 Idiots मधील Rancho/Funsuk Wangdu ही व्यक्तिरेखा नक्कीच आठवली असेल! "पाण्यात बुडल्यानंतर कोणत्याही पदार्थाचे द्रव्यमान कमी होते", या विज्ञानाच्या साध्या नियमाचा त्यांनी खडकवासला धरणाचे दरवाजे बांधताना उपयोग करून घेतला. त्यासाठी त्यांनी दोर, Gate, Duct आणि प्रतिवजनाचा (Counterweight) आधार घेतला.

पाण्याचा दाब वाढला की पाणी Duct मध्ये येते आणि प्रतिवजन कमी झाल्याने दरवाजे आपोआपच उघडतात. पाणी ओसरले की प्रतिवजन पूर्वपदावर येते आणि दरवाजे आपोआप बंद होतात. विजेशिवाय चालणारे हे स्वयंचलित दरवाजे म्हणजे धरणक्षेत्रात नवीन क्रांतीच होती. या तंत्राचे Patent त्यांच्या नावे झाले; पण देशप्रेम व जनसेवा या गुणांमुळे या Patent चे पैसे घेण्यास सर एम. व्ही. यांनी नकार दिला.

पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि जलविद्युत निर्मिती ही काळाची गरज होती. ही गरज ओळखून त्यांनी निरा नदीच्या किनारी सिंचनासाठी Block व्यवस्थेची सुरुवात केली. या व्यवस्थेमध्ये पाण्याचे वितरण शास्त्रीय पद्धतीने केले गेले. त्यामुळे प्रभागाच्या एक तृतीयांश क्षेत्रात उसाचे व दोन तृतीयांश क्षेत्रात रब्बी आणि खरीपाची पीके घेता येऊ लागली. ही योजना तात्कालिक नव्हे तर सार्वकालिक ठरली. म्हणून तर पुणे, नाशिक, अहमदनगर आणि कृष्णराजसागर धरण क्षेत्रात म्हणजेच महाराष्ट्र आणि कर्नाटकात सिंचन क्षेत्रात आजही Block पद्धतच वापरली जाते.

सर विश्वेश्वरैय्या हे केवळ अभियंताच नव्हते, तर ते एक पर्यावरणतज्ञ आणि हळव्या मनाचे छायावादी कवीही होते. त्याच भावनेतून त्यांनी प्रत्येक धरण आणि जलाशयाच्या आसपास उद्याने व Walk way तयार केले. प्रचंड मोठा पाणीसाठा आणि दूरवर पसरलेली हिरवाई! कृष्णराजसागर धरण आणि वृंदावन उद्यान यांमुळेच सर एम. व्ही. ना "आधुनिक म्हैसूरचे जनक" असेही संबोधले जाते. त्यांना अनेक मानसन्मान मिळाले. आठहून अधिक संस्थांची मानद Doctorate त्यांना मिळाली. सुमारे दोन डझन संस्थांना त्यांचे नाव देण्यात आले आहे. ब्रिटीश सरकारचा CIE हा बहुमान त्यांना मिळाला. १९५५ मध्ये सर एम्. व्ही. यांना "भारतरत्न" या पुरस्काराने गौरविण्यात आले. अशा या थोर व्यक्तिमत्त्वास विनम्र अभिवादन...

******

## सार काही थांबलं

कल्पना करू शकत नाही, किती होतं चांगलं।
निसर्गाचा कोप झाला, सारं काही थांबलं।

वृत्तपत्रे, दूरदर्शनचे, दर्शन घ्यावंसं वाटत नाही।
रेमडेसीवर, ऑक्सिजन, बेड, चौफेर कोठे भेटत नाहीत।
अभाव त्याचा धावपळ त्यासाठी, काळीज कुणाचं तुटत नाही।
बंद झाली देव द्वार, देव दर्शन लांबलं।। १ ।।

जिवलग नाते उधळला पैसा, तेही कामात येत नाही।
डोळ्यासमोर तगमगतांना, कोरोना साला भीत नाही।
नातगोतं जातपात गरीब–श्रीमंत, त्याचे जवळ भेद नाही।
कोपू नको निसर्ग राजा, मूल तुझं सानुलं ।। २ ।।

तुम्ही आम्ही सामान्य जनता, व्हावे आता जागृत।
सुरक्षित अंतर, मास्क, सॅनिटायझर, त्रिसूत्री करा अंगभूत ।
सकारात्मक विचारांसाठी, उघडे ठेवू दालन।
आपले आपण सैनिक होऊ, करू नियमांचे पालन।
एकमेका ऊब देणे, यांत नाही काही वंगाळ ।। ३ ।।

जणूकाही आभाळच फाटलं, तेथे कोण लावील ठिगळ।
जागे व्हा आता तरी, काढून टाका मरगळ।
विद्युतसेवक, पोलीस, डॉक्टर, जीवाची लावली त्यांनी बाजी।
आभार मानू त्यांचे आपण, देवाला करतात ते राजी।
वेळ नाही आता हे बघण्याची, कोण कसं वागलं।
निसर्गाचा कोप झाला, सारं काही थांबलं।। ४ ।।

**– शालिग्राम साबे**
**तंत्रज्ञ–१,**
**पारस औ.वि. केंद्र.**





## राईस प्लेट

सहा वाट्या तीन भाज्या
स्वागतास ताक उभा
मखमली गालिच्यावर उगाचच
चमच्यांचा रांगा...

पापडाची बडबड सांगे
ताशांचा लढा
पसरलेले लोणचे जणू
कुंकवाचा सड़ा...

हळदीत भिजली
खुप थटली नवरी डाळ
सोन्याचांदीच्या तडक्यात
सजली धन्याचीही माळ...

रागाच्या वाफेने
नवरदेव भात
आज जास्तच फुगला
सासऱ्याने दिलेला जिऱ्याचा सूट आखुड़ जो पडला...

पण चमकले डोळे
पाहून डाळीचा शृंगार
बोलला बिना कपड्यातही मी
लग्नाला तय्यार...

तिचेही प्रेम फार
दिला भातालाही पिवळा रंग
बोलली प्रेमाच्या प्रत्येक घासात
आता जळणे तुझ्यासंग...

**– प्रविण दिलीप भोईर**
**व्यवस्थापक (वित्त व लेखा),**
**मुख्य सांघिक कार्यालय, मुंबई.**

## पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात संपन्न



पारस औष्णिक विद्युत केंद्रात 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पारस औष्णिक विद्युत केंद्रात दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान विविध उपक्रम राबविण्यात आले.

अमृत महोत्सव अंतर्गत वीज केंद्रातील प्रशासकीय इमारत व मुख्य प्रवेशद्वार येथे रोषणाई करण्यात आली. दि. १३ ऑगस्ट रोजी उपमुख्य अभियंता श्री. शाम राठोड आणि दि. १४ ऑगस्ट रोजी अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच स्वतंत्रता दिवशी मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी वीज केंद्रातील संपूर्ण अभियंते, अधिकारी-कर्मचारी व कंत्राटी कामगार उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित होते.







परळी औष्णिक विद्युत केंद्रात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अधिकारी, अभियंते-कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथे मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी व महिला कर्मचारी.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारीवृंद .

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) मा.श्री. पंकज सपाटे यांची आढावा बैठक संपन्न





# गौरव - अभिनंदन




दिनांक १९ सप्टेंबर २०२२ रोजी रामदेवबाबा इंजिनियरिंग कॉलेज, नागपूर येथे ३३व्या क्वॉलिटी सर्कल, नागपूर चॅप्टर या स्पर्धेत पारस औष्णिक विद्युत केंद्रातील नियंत्रण व उपकरणे या विभागास Best Pagesetting करिता Super Gold Award आणि Best Presentation करिता Super Gold Award ने गौरवान्वित करण्यात आले. तसेच, बाष्पक संधारण या विभागास Best Presentation करिता Super Gold Award ने गौरवान्वित करण्यात आले.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे कार्यरत असलेले श्री. राजेंद्र वसंत झोपे, पहारेकरी (सुरक्षा विभाग) यांचा पाल्य कु. जीवन हा इयत्ता १०वी सी.बी.एस.ई. बोर्डमध्ये ९०% गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे तंत्रज्ञ-१, (संचलन - ५०० मेगावॅट) या पदावर कार्यरत असलेले श्री. किरण महारु चव्हाण यांची पाल्या कु. भाग्यश्री ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षमध्ये (इयत्ता १०वी) ९५% गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात तंत्रज्ञ - १या पदावर कार्यरत असलेले श्री. दादाराव लक्ष्मण झिने यांची पाल्या कु. आयुषी ही शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये केंद्रीय बोर्ड माध्यमिक परीक्षेत (CBSE) (इयत्ता १०वी) ९३.२०% गुण मिळवून प्राविण्यासह उत्तीर्ण झालेली आहे.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात तंत्रज्ञ - १ या पदावर कार्यरत असलेले श्री. दिलीप आर. पातोडे यांचा पाल्य कु. आर्यन हा शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये केंद्रीय बोर्ड माध्यमिक परीक्षेत (CBSE) (इयत्ता १०वी) ९०.८०% गुण मिळवून प्राविण्यासह उत्तीर्ण झाला आहे.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात टंकलेखक या पदावर कार्यरत असलेले श्री. आर.एम. येरमे यांची पाल्या कु. सुरभी हिची MS in Industrial System and Engineering (MSE-ISE) या उच्च शिक्षणाकरिता University of Michigan Dearborn, USA (अमेरिका) येथे निवड झालेली असून तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात तंत्रज्ञ - २ या पदावर कार्यरत असलेले श्री. दिगंबर मोतीराम राठोड यांचा पाल्य कु. स्वप्नील हा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२वी) मार्च - २०२२ मध्ये ८६.६७% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.



महानिर्मिती सांघिक कार्यालय मुंबई येथील कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) मा.श्री. नितीन हनुमंतराव चांदुरकर यांचे पाल्य कु. अनिश नितीन चांदूरकर हा ICSE बोर्ड इयत्ता दहावी मध्ये ९७% गुण घेऊन उत्तीर्ण झाला आहे. विशेष अभिनंदनीय बाब म्हणजे गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत. तसेच कु. अरिन नितीन चांदूरकर हा ICSE बोर्ड इयत्ता दहावी मध्ये ९९% गुण घेऊन उत्तीर्ण झाला आहे. विशेष अभिनंदनीय बाब म्हणजे ४ विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत, कु. अरिन ह्याने IES Schools मुंबईच्या ICSE बोर्ड मधील सर्व शाखांमधून प्रथम स्थान पटकावले आहे.



# मानव संसाधन विभाग, मुख्यालयातर्फे अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



नॅशनल पार्क, बोरीवली, मुंबई येथे महानिर्मितीचे अधिकारी-कर्मचारी यांचेमार्फत सह्याद्री देवराई या संस्थेमार्फत वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात अंदाजित ३० रोपांची लागवड करण्यात आली.



अधिकारी कर्मचारी यांच्याकरिता मराठी भाषेमध्ये कार्यालयीन टिप्पणी पत्र व परिपत्रके तयार करण्याच्या कार्यपध्दतीबद्दलची कार्यशाळा सांघिक कार्यालय, धारावी येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत श्री. प्रथमेश पालव, मुख्य लिपिक (मासं) यांनी या विषयाबाबतचे मार्गदर्शन दिले.



महानिर्मिती कंपनीतर्फे "Towards Medicine Free Life to Improve Working Efficiency & Mental Health" या विषयावर सभागृह सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई येथे National Education या संस्थेतर्फे आयोजन करण्यात आले होते.




"सफलता की उडान" एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सांघिक कार्यालय येथील प्रेक्षागृह येथे करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये मा. श्री. जयप्रकाश काबरा यांनी प्रशिक्षण दिले.



महानिर्मिती कंपनी 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेतून Mind Management या विषयाबाबतची प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई येथे करण्यात आले. सदर कार्यशाळेत आचार्य स्वामी ध्रुव यांनी अनमोल मार्गदर्शन देऊन उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना संबोधित केले.




SAP प्रणालीमधून गोपनीय अहवाल भरण्याची प्रक्रिया या विषयाचे प्रशिक्षण कोराडी प्रशिक्षण विभाग तसेच नाशिक प्रशिक्षण विभाग येथे सदर कामाशी संबंधित अधिकारी कर्मचारी यांना देण्यात आले. सदर प्रशिक्षणाकरीता श्री. कौस्तुभ विठ्ठल इंगवले, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-गोपनीय अहवाल कक्ष) व श्री. अण्णा बागडे, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं-माहिती तंत्रज्ञान) यांनी मार्गदर्शन केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध क्रीडा-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.










## परळी औष्णिक विद्युत केंद्रात राजीव गांधी जयंतीनिमित्त सद्भावना दिवस संपन्न





परळी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी यांच्या जयंती दिनी सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकारी, अभियंते, कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगारांनी सामुहिक शपथ घेतली, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.





भुसावळ प्रकल्प (१×६६० मेगावॅट) येथे मुख्य अभियंता मा.श्री. विवेक रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री. एस.डी. महाजन माजी संचालक (तांत्रिक) (महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगीची ही छायाचित्रे.





पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवसपर सामूहिक प्रतिज्ञा वाचन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी व महिला कर्मचारी.







नाशिक प्रशिक्षण केंद्रामध्ये ६ दिवसीय "Effective Implementation of Environmental Laws & Regulations" या विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) मा.डॉ.श्री. नितीन वाघ व नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. प्रफुल्ल भदाणे तसेच जल, औष्णिक विद्युत केंद्रातील आणि मुख्यालयातील स्थापत्य अभियंते आणि रसायनतज्ञ सहभागी झाले होते. सदर प्रशिक्षणादरम्यानची ही छायाचित्रे.







उरण वायु वीजनिर्मिती केंद्र येथे योगा दिवस संपन्न झाला. त्यावेळी योगा प्रात्यक्षिके करताना अधिकारी, अभियंते-कर्मचारी व महिला कर्मचारी.





महानिर्मितीच्या धारावी कार्यालयात कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) मा.श्री. नितीन चांदूरकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी उपस्थित धारावी कार्यालयातील अधिकारी, अभियंते-कर्मचारी, सुरक्षितता अधिकारी, सुरक्षा रक्षक व कंत्राटी कामगार.

महानिर्मितीचे मा. संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव आणि मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) मा.श्री. डी.सी. पाटील यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार सोहळा प्रकाशगड, सांघिक कार्यालय येथे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी. अन्बलगन यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.













कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचा ४८व्या वर्धापन दिनानिमित्त क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक व मनोरंजनपर उपक्रम संपन्न झाला, यावेळी कोराडी औ.वि. केंद्रातील सर्व अभियंते, अधिकारी-कर्मचारी व कंत्राटी कामगारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.












## आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत 'उज्ज्वल भारत - उज्ज्वल भविष्य' या संकल्पनेच्या अंमलबजावणीमध्ये महानिर्मितीचा लक्षणीय सहभाग




नागपूर

नागपूर येथील 'उज्ज्वल भारत - उज्ज्वल भविष्य' या कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना केंद्रिय मंत्री मा. ना. नितीन गडकरी



कुलाबा बेस्ट भवन, मुंबई





क्षणचित्रे



भांडुप, मुंबई



अमरावती



कळमनुरी (ग्रामीण)




सावरगाव (नाशिक ग्रामीण)

## आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत 'उज्ज्वल भारत - उज्ज्वल भविष्य' या संकल्पनेच्या अंमलबजावणीमध्ये महानिर्मितीचा लक्षणीय सहभाग.



अकोला




बुलढाणा





यवतमाळ






नाशिक



एकलहरे, नाशिक



सिंधुदुर्ग

## मोबाईल इंटरनेटमुळे

मोबाईल इंटरनेटमुळे
पोरं माणसं गेले वाया
२४ तास अन्न पाणी
वाचून लागले राहाया

भान तर हरवलं
काय काम करत होते
निशाणा कुणी कळे
माय लेकरू न सांभाळते

कसा जमाना आला
इंटरनेटचा दिवाना झाला
मानसिक आरोग्य
धोक्यात लागले यायला

स्मृतिभ्रंश आजारही
वाढला हृदयविकार
डोळे गेले, मान वाकडी झाली
संपेल केव्हा आजार

दवाखाने भरले सर्वच
विचार थोडा करावा
आता तरी मानवा
मोबाईल बाजूला ठेवा

**- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
**एम.आय.एस. विभाग,**
**पारस औ.वि. केंद्र,**







## मनापासून कोसळणारा पाऊस

एकटक बघ मित्रा,
पाऊस कसा, मनापासून कोसळतो,
मनातील सुख-दुःख,
जवळ ठेवून, क्षणातच मग ओसरतो

कळ्या फुले पाने झाडे,
एका थेंबासाठी, मोर पिसारा फुलवतो,
आसमंत निळा सारा,
इंद्रधनुष्य अर्धगोल, सप्तरंग खुलवतो

नदी-नाल्या भरुन
दऱ्याखोऱ्यांत, शेतात मग तू पसरतो,
गावा-घरांत येऊन,
पाहुणा होऊन, साऱ्या घरामध्ये मिसळतो,
एकटक बघ मित्रा,
पाऊस कसा, मनापासून कोसळतो

पूर आला नदीला,
गावांतून तू, का साऱ्यांना हलवतो ?
हसवतो खळखळून,
कधी कुणाला, का नकळत रडवतो ?
मनातील सुख-दुःख
जवळ ठेवून, क्षणातच मग ओसरतो

पावसाच्या सरी येती,
भेटीगाठी साठी, कोण कुणाला अडवतो,
ओल्या होती आठवणी,
जागेपणीचे ते स्वप्न, नकळत तू घडवतो

तुटतात सारी स्वप्ने, जेव्हा तू अचानक मोठ्याने गरजतो,
एकटक बघ मित्रा, पाऊस कसा, मनापासून कोसळतो.

**- राजेश अंबादास पवार**
**व्यवस्थापक (वित्त व लेखा),**
**भुसावळ औ.वि. केंद्र,**



## कोडे

संसार चक्राचा, कसा जाणावा भेद ।
श्रृंखला भंग करण्या, कुठे द्यावा छेद ।।

भूत होता वर्तमान, तेव्हा भविष्याचा वेध ।
वर्तमानात आता पुन्हा, भुताचा खेद ।।

सामान्य जन आम्ही, अहो जीवनासक्त ।
त्यांनी केली भक्ती, म्हणून आम्ही भक्त ।।

जीवन आणि मृत्यु, हाच आम्हां संसार ।
संत सांगतात शोधा आता, मुक्तीचे द्वार ।।

काय माहीत कोणा, समजले जीवनमर्म ।
सुजाण होऊन घडू द्या, उत्तम नित्यकर्म ।।

**– डॉ. अतुल बनसोड,**
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता,**
**कोराडी प्रकल्प (३×६६० मेगावॅट)**



## दिवाळी करावी साजरी

दिवाळी करावी साजरी
सर्वांच्या मनाचा हेत
कबाळ कष्ट मेहनत
पै पै काटकसरी जमा करत

श्रीमंत मोठ्या लोकांची
होते खरी साजरी दिवाळी
नीटनेटकी का वाकडी
तिकडे देवाला अर्पण झोपडी

देवी कुठे अवतरणार
रंग रांगोळी अंगणात
मनाची सफाई सदा
ज्याची ज्याची होत

नियमाने भक्ती अर्चा
पूजनात आवाहन मिष्टांन्नाचे
जेवण काही
ना घ्यावे सांगून

देईल ते नशीब
कर्म ते प्रारब्ध
पूजन करा मनोभावे
हात जोडूनी स्तब्ध

**– राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
**एम.आय.एस. विभाग,**
**पारस औ.वि. केंद्र,**

## आत्मकंदील

कंदील तेवढा माझा
राहू दे माझ्यापुरता
दर्वळे पहाडापार
सुरांची अत्तरगाथा

ते दिवे नग्न कायेचे
कामाचे काय बदामी
तुटलेल्या काचा काळ्या
माझ्याच येतील कामी

उकिडव्या जरी बसलेल्या
न्हाणास जणू सावल्या
स्वरिकेच्या कंपासरशी
मृगजळातून धावल्या

श्वासावर पडता कुंकू
झटकतो माझे मी हात
नांगरुन आता घेतो
आत्म्याचे शुष्क हे शेत

**– प्रिन्स – महेश आफळे**
**जनसंपर्क अधिकारी**
**सांघिक कार्यालय, मुंबई**



## महानिर्मितीतर्फे मुंबई मुख्यालय येथे अभियंता दिन उत्साहात संपन्न

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांचे अध्यक्षतेखाली मुख्यालय प्रकाशगड येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी केवळ औपचारिक चर्चेऐवजी काही मौलिक व प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित चर्चा व्हावी असे आवाहन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांनी महानिर्मितीच्या व्यवस्थापनामधील वरिष्ठ अभियंता / अधिकारी यांना केले. त्यानुसार उपस्थित अभियंत्यांनी वीज निर्मिती क्षेत्रात काम करताना आलेल्या आव्हानात्मक परिस्थितीत आलेले अनुभव व त्याकरिता केलेल्या तत्कालीन उपाययोजना तसेच वीजनिर्मिती प्रकल्पामध्ये कार्यसुलभता यावी याकरिता केलेले नावीन्यपूर्ण उपाययोजना विषद केल्या. यामध्ये संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारूडकर, कार्यकारी संचालक (कोल) मा.श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) मा.श्री. विठ्ठल खटारे तसेच मा. मुख्य अभियंते सर्वश्री. राजेश मोराळे, प्रसन्न कोटेचा, संजय कुऱ्हाडे तसेच उपमुख्य अभियंता श्री. आनंद जोशी व अधीक्षक अभियंता श्री. राहुल नाळे यांनी आपले अनुभव मांडले. यामधून भारत हेवी इलेक्ट्रिकल्स तसेच अलस्टॉम इत्यादि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आस्थापनांनी महानिर्मितीच्या अभियंत्यांची घेतलेली दखल व केलेले कौतुक दिसून येत असून महानिर्मितीमधील अभियंते भविष्यातील आव्हाने पेलण्यास सक्षम असल्याचे महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांनी नमूद केले. संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव यांनी कोळसा हाताळणीमध्ये कार्यसुलभता येण्याकरिता प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी संचालक (वित्त) मा.श्री. दत्तात्रय पाटील तसेच कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) मा.डॉ . नितीन वाघ, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) मा.श्री. भिमाशंकर मंता तसेच अधिकारी व अभियंता उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये महानिर्मितीच्या पर्यावरण व सुरक्षा विभागाकरिता जनसंपर्क विभागाने पुढाकार घेऊन तयार केलेल्या महानिर्मितीच्या पर्यावरणविषयक उपक्रमांची माहिती देणारी चित्रफित प्रदर्शित करण्यात आली. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. ज्योती हंकारे यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचे जीवनकार्य विषद केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी संतोष पुरोहित यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात स्वातंत्र्य दिनी ७५वा स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सव उत्साहात संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात स्वातंत्र्य दिनी ७५वा स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सव उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी नाशिक औ. वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे यांचेद्वारे परेड निरीक्षण करण्यात आले. या प्रसंगी सुरक्षा विभाग, मेस्को सुपरवायझर, मेस्को गार्ड, सुरक्षा रक्षक मंडळ, अग्निशमन विभाग याद्वारे मानवंदना देण्यात आली. याकरिता वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. केशव मारूती नरवाड यांनी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार ध्वजारोहण शिष्टाचार पार पडला.

मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण आणि त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

याप्रसंगी सर्व उपस्थित अधिकारी, अभियंते, कर्मचारीवृंद, कंत्राटी कामगार कंत्राटदार तसेच वसाहतवासियांसाठी मुख्य अभियंताद्वारे सामूहिकपणे प्रतिज्ञा वाचन करण्यात आले.

मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे यांनी मार्गदर्शन करताना "७५व्या स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सवी" भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. वीजनिर्मितीचे अधिकारी अभियंते, कर्मचारीवृंद इतर घटक यांनी आपल्या तांत्रिक कौशल्याने पूर्ण क्षमतेने ऊर्जा निर्मिती करून वेळोवेळी नाशिक औष्णिक वीज केंद्राची क्षमता दाखवून दिली. मागच्या २ वर्षांचा काळात कोरोना-कोविडमुळे सर्वांनाच त्रास सहन करावा लागला. त्याकरिता सर्वांनी तिसरे लसीकरण आवर्जून घेण्याचे सांगितले.

राष्ट्रीय कार्यक्रमाकरिता वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, उपमुख्य अभियंता (कार्य) श्री. एकनाथ मोझे अधीक्षक अभियंता श्री. शशांक चव्हाण, श्री. अभिजित आहेर, श्री. प्रविण गोसावी, श्री. आर.पी. कुमावत, सर्व विभागप्रमुख, अधिकारी-अभियंते, कर्मचारीवृंद, कंत्राटी कामगार, कंत्राटदार तसेच वसाहतवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाने जनतेचा मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायम स्वरूपी मनात रहावी व त्याचे स्मरण व्हावे या उद्देशाने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक १३ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर तिरंगा" असे उपक्रम राबविण्यात आले व रोज सकाळी ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

तसेच भारतीय स्वातंत्र्याचा ७५वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सवी या उपक्रमाच्या अनुषंगाने प्राप्त निर्देशान्वये दिनांक १७ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी 'समूह राष्ट्रगीत गायन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रभारी कल्याण अधिकारी श्री. अनिल कांबळे यांनी केले.

## ३३व्या क्वॉलिटी सर्कल, नागपूर चॅप्टर स्पर्धेत पारस औ.वि. केंद्रातील नियंत्रण व उपकरणे विभागाचे अभूतपूर्व यश

दिनांक १९ सप्टेंबर २०२२ रोजी रामदेवबाबा इंजिनियरिंग कॉलेज, नागपूर येथे ३३व्या क्वॉलिटी सर्कल, नागपूर चॅप्टर या स्पर्धेत पारस औष्णिक विद्युत केंद्रातील नियंत्रण व उपकरणे या विभागास Best Pagesetting करिता Super Gold Award आणि Best Presentation करिता Super Gold Award ने गौरवान्वित करण्यात आले. तसेच, बाष्पक संधारण या विभागास Best Presentation करिता Super Gold Award ने गौरवान्वित करण्यात आले.

दि. २७ ते ३० डिसेंबर २०२२ रोजी औरंगाबाद येथे NCOC होणाऱ्या स्पर्धेत दोन्ही चमू पात्र झालेले आहेत. सदर कार्यक्रमात नियंत्रण व उपकरणे विभागाचे प्रतिनिधित्व श्री. यशवंत डी. लोखंडे (उप कार्यकारी अभियंता), श्री. सुनय खडसे (सहाय्यक अभियंता), वैभव हिंगणे (कनिष्ठ अभियंता) व बाष्पक संधारण विभागातील प्रतिनिधित्व श्री. अनुप गावंडे (उप कार्यकारी अभियंता), श्री अक्षय शिंदे (सहाय्यक अभियंता), श्री. सुरेंद्र हिरडे (कनिष्ठ अभियंता), श्री सुनील सरपाते (तंत्रज्ञ-२), श्री. योगेश साबळे (तंत्रज्ञ-१) यांनी केले व सदर चमूला क्वॉलिटी सर्कलकरिता लागणारे प्रशिक्षण मार्गदर्शन श्री. आशिष पाहुरकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता) यांचे लाभले.

सदर उपक्रमामध्ये मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर व उपमुख्य अभियंता श्री. शाम पी. राठोड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली गुणवत्ता मंडळ चमूने हे भरीव यश संपादित केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. १५ सप्टेंबर २०२२ रोजी सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात सुरुवातीस सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तद्नंतर, सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जीवनकार्याबद्दलची माहिती विषद करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व इतर अभियंते, अधिकारी/कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांची कार्य करण्याची शैली व दूरदृष्टी असलेली क्षमता आपल्यात निर्माण करावी, असे प्रतिपादित केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातर्फे शिक्षक दिन संपन्न

आपण विद्यार्थीदशेत किंवा सर्व्हिस करत असतांना दिवसभरातील आपले आत्मपरीक्षण स्वत: करून झालेल्या चुकांमधून शिकवण घेत त्या सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच 'श्यामची आई' या चित्रपटातील आईने मुलाला दिलेला बोध, "पायाला माती लागली तर ती पुसली जाऊ शकते, परंतु मनाला माती लावू देऊ नको. म्हणजे मनात चुकीचे विचार आणू नको. मन मलिन होऊ देऊ नको". त्याचबरोबर पन्नास वर्षांपूर्वीचा शिक्षक व आजचा शिक्षक यात जमीन-आस्मानचा फरक पडलेला आहे. आज कोणताही पेशा बघा शिक्षकी पेशा असो किंवा डॉक्टरकी पेशा असो सर्व नि:स्वार्थी सेवा करण्याचा पेशा राहिलेला नाही, हा बिझनेस झालेला आहे. या बिझनेसच्या युगामध्ये कुठे ना कुठेतरी ज्यांची आर्थिक परिस्थिती ठीक नाही अशांची मदत करण्यासाठी सानेगुरुजी वाचनालयाचे पदाधिकारी माझ्यासह प्रयत्नशील असून त्याच्यात मोठा बदल घडवण्याचा प्रयत्न करत आहोत. असे प्रतिपादन भुसावळ औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विजय राठोड यांनी केले. मुख्य अभियंता श्री. राठोड हे फेकरी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत शिक्षकदिनाचे औचित्य साधून दिपनगर येथील सानेगुरुजी वाचनालयातर्फे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात बोलत होते.

यावेळी त्यांच्या हस्ते १ ते ५वी च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. याप्रसंगी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. जिल्हा परिषद मराठी शाळेतील मुख्याध्यापिका सुनिता जोशी, शिक्षिका प्रियंका कांबळे व महानिर्मितीचे भुसावळ औ.वि. केंद्रातील कर्मचारी माधव काळे हे या महिन्यात सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी शाळेच्या पटांगणाची दुरवस्था बघून मुख्य अभियंतांनी खंत व्यक्त केली व शाळेत बऱ्याचशा सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत कारण बऱ्याचश्या सोयी अजून येथे नाहीत. शिक्षक जो शिक्षणाचा मूळ गाभा सामाजिक परिवर्तनाचा तो थोडासा घट्ट करण्याची आवश्यकता आहे. यासाठी आम्ही आमच्या परीने मदत करू, तरी याकडे शासनाने सुद्धा लक्ष दिले पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रसंगी सत्काराला उत्तर देताना मुख्याध्यापिका सुनीता जोशी यांनी आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचनालयाचे उपाध्यक्ष सचिन भिरुड, सचिव व्यवस्थापक लेखा विभागाचे राजेश पवार, खजिनदार भरत पाटील, संचालक तेजराव नाईक, सुरेश वरणकार, ग्रंथपाल प्रतिभा खर्चे, लिपिक कविता पाटील, प्रवीण रामदास बोदडे, माधव काळे, मनोहर बान्हे यांनी परिश्रम घेतले. यावेळी राजेश निकम, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भरत पाटील यांनी तर आभार राजेश पवार यांनी मानले.

## मुख्यालय, मुंबई येथे "हर घर तिरंगा" संकल्पनेअंतर्गत उपक्रम संपन्न

"हर घर तिरंगा" या संकल्पनेअंतर्गत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांना आवाहन करणारा उपक्रम तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तत्कालीन मा.श्री. संजय खंदारे यांचे हस्ते प्रकाशगड, मुंबई मुख्यालय येथे दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी संपन्न झाला.

याप्रसंगी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मानव संसाधन) मा.श्री. मानवेंद्र रामटेके आणि संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांचेसह मुख्यालयातील सर्व कार्यकारी संचालक तसेच मुख्य अभियंता व मुख्य महाव्यवस्थापक यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमात कार्य विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. नितीन जोगळेकर ह्यांनी आपल्या बासरीवादनातून देशभक्तीपर सूर लावून उपस्थितांची मने जिंकली. सदर कार्यक्रमास बहुसंख्य अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले.

## प्रतिक्रिया

सप्रेम नमस्कार,

नुकताच सृजनचा एप्रिल-जून २०२२ चा अंक हाती पडला. अत्यंत सुबक व वैचारिक मांडणी व महानिर्मिती परिवारातील ठळक घडामोडींचा आढावा घेणारा हा अंक निश्चितच वाचनीय आहे. गेली अनेक वर्ष मेहनत घेऊन आपण रुजवलेल्या सृजनच्या या वैचारिक व साहित्यिक रोपट्याचे आज एका वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आपले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. मात्र सृजनचा पुढील अंक हा कदाचित शेवटचा अंक असेल हे वाचून अत्यंत वाईट वाटले. महानिर्मितीसारख्या देशातील प्रथम क्रमांकाच्या राज्य शासनाच्या विद्युत उपक्रमासाठी एक मुखपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र कर्मचाऱ्यांचा मिळणारा अत्यल्प प्रतिसाद खरोखर अत्यंत दुर्दैवी आहे. मोबाइल व वेब सिरीजच्या या युगात वाचन संस्कृती लोप पावते आहे. तरी सुद्धा आपणास विनंती की, ही चळवळ अशीच पुढे सुरु ठेवावी, काही नवीन उपक्रम राबवून वाचनाची आवड वाढवून हा वसा असाच पुढे सुरु ठेवावा. आमच्याकडून लागणारे सर्व सहकार्य आपणास निश्चितपणे उपलब्ध राहील, ही ग्वाही देतो.

**- संजय कुलकर्णी**
कार्यकारी अभियंता, गट-२,
(मध्यवर्ती खरेदी कक्ष),
मुख्यालय, मुंबई.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात राजे उमाजी नाईक यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक ७ सप्टेंबर २०२२ रोजी आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तद्नंतर आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या जीवनकार्याबद्दलची माहिती विषद करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. शाम पी. राठोड, अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, धनंजय पंधाडे व श्री. संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व अन्य अभियंते, अधिकारी /कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे राजे उमाजी नाईक यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे दि ७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री संजय चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. डी.व्ही. पाटील आणि कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) सौ. स्नेहल नकाते यांनी या जयंती कार्यक्रमावेळी राजे उमाजी नाईक यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## भुसावळ प्रकल्प (१×६६० मेगावॅट) कार्यालय येथे अभियंता दिन उत्साहात संपन्न

दिनांक १५ सप्टेंबर २०२२ रोजी भुसावळ प्रकल्प (१×६६० मेगावॅट) कार्यालयामध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रकल्पाचे मुख्य अभियंता मा.श्री. विवेक पांडुरंग रोकडे यांनी भूषविले.

तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री. एस.डी. महाजन - माजी संचालक (तांत्रिक)(महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) लाभले. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कार्यालयातील पुरुष-महिला अधिकारी, अभियंते-कर्मचारीवृंद उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार यांनी पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

या अभिवादनपर कार्यक्रमास वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे, उप व्यवस्थापक (सुरक्षा) श्री एस.बी. शिर्के, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. डी.व्ही. पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) सौ. स्नेहल नकाते आणि कार्यालयातील पुरूष व महिन्या अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. उप कार्यकारी अभियंता सौ. मल्लिका मुजावर यांनी या प्रसंगी केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे याच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवस संपन्न

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे उप महाव्यवस्थापक (मासं.) श्री. प्रकाश प्रभावत यांच्या अध्यक्षतेखाली सद्भावना दिवस पाळण्यात आला. याप्रसंगी कोराडी औ.वि. केंद्रातील ऊर्जा भवन सभागृहात सकाळी स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त उप महाव्यवस्थापक (मासं) श्री. प्रकाश प्रभावत ह्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन 'सद्भावना दिवस' प्रतिज्ञाचे सामुहिक वाचन केले.

या अभिवादनपर कार्यक्रमास व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. व्ही.एस. वडोडकर, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री. दिवाकर देशमुख, उप व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. नविनकुमार सतिवले आणि अन्य पुरूष व महिला अधिकारी कर्मचारी वर्ग तसेच कंत्राटी कामगार उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्याण अधिकारी सौ. प्रिती आनंद रामटेके यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी, प्रमुख उपस्थिती म्हणून अधीक्षक अभियंता श्री. संजय कांबळे व इतर अभियंते, अधिकारी/कर्मचारीवृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सहाय्यक अभियंता श्री. नीलकंठ आळशे यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात गणेश उत्सव संपन्न

दिनांक ३१.०८.२०२२ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे गणेश चतुर्थी या सालाबादप्रमाणे व जवळपास अखंड ४० वर्षापासून श्री. गणेश मूर्तीची स्थापना करण्याची परंपरा चालू आहे. सार्वजनिक गणेश उत्सव समितीच्या माध्यमातून १० दिवसांचा श्री गणेश उत्सव साजरा करण्यात आला. या दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष तथा पारस औष्णिक विद्युत केंद्राचे मा. मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर यांच्या हस्ते जुने क्लबमध्ये श्री गणेश मूर्तीची स्थापना करून विधीवत पूजा व आरती करण्यात आली. या प्रसंगी त्यांनी उपस्थितांना श्री गणेश उत्सवानिमित्त शुभेच्छा देतांना सांगितले की, "तुमच्या आयुष्यातला आनंद त्या विघ्नहर्त्याच्या पोटाइतका विशाल असावा, आयुष्य हे सोंडेइतके मोठे असावे व अडचणी उंदराइतक्या लहान असावे".

कार्यक्रमाचा समारोपात विशेष अतिथी म्हणून मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था – २) मा.श्री. पंकज सपाटे यांची उपस्थिती लाभली व त्यांनी वीज केंद्रातील सर्व अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना गणेश उत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाप्रसंगी औ. वि. केंद्राचे उपमुख्य अभियंता श्री. शाम पी. राठोड, अधीक्षक अभियंते श्री. आर.बी. गिरी, श्री. धनंजय पंधाळे, श्री. संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व तसेच केंद्रातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी, कामगार संघटनांचे पदाधिकारी, वसाहतीमध्ये राहणारे नागरिक व गणेश भक्त मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

## परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे राजे उमाजी नाईक यांची जयंती संपन्न

दि. ७ सप्टेंबर २०२२ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे राजे उमाजी नाईक यांची २३१वी जयंती सकाळी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात उप मुख्य अभियंता श्री. डी.जी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

यानिमित्त सर्वप्रथम उप मुख्य अभियंता श्री. डी.जी. इंगळे यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास प्रभारी उपमुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. एन.के. चन्ने, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. ए.एम. येरणे, व्यवस्थापक (मासं) श्री ए.व्ही. सुत्रावे व श्री. व्ही.जी. ताटे, कार्यकारी अभियंता श्री. मदन पवार तसेच अन्य अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. के.एच. गित्ते तर आभार श्री एम.एस. शिंदे यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवस संपन्न

दि. २० ऑगस्ट २०२२ रोजी नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे सकाळी प्रशासकीय इमारत येथे 'सद्भावना दिवस' पर सामूहिक प्रतिज्ञा वाचन व राजीव गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.

या अभिवादनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. पी. एन.भदाणे, तसेच उप मुख्य अभियंता (संचलन व सुव्यवस्था) श्री. बाबासाहेब पाटील, अधीक्षक अभियंते सर्वश्री. शशांक चव्हाण, प्रविण गोसावी, अभिजीत आहेर, कार्यकारी अभियंते सर्वश्री. देवीदास राऊत, चंद्रकांत भांबरे, व्यवस्थापक (मासं) श्री. बाबासाहेब गायकवाड, उप व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. सुमंत दराडे, उप कार्यकारी अभियंता श्री. उमाकांत चव्हाण आणि अन्य अधिकारी, कर्मचारीवृंद अभिवादनासाठी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रभारी कल्याण अधिकारी श्री. अनिल कांबळे यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती संपन्न

दि. २३ जुलै २०२२ रोजी परळी वै. औष्णिक विद्युत केंद्र येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १६६वी जयंती प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

यानिमित्त सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे जीवनकार्य सांगून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे विचार आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री. डी.जी. इंगळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. एन.के. चन्ने तसेच अन्य अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. के.एच. गिते यांनी तर आभार कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी यांनी केले.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. २३ जुलै २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी, या जयंती कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार आणि वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे, उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एस.बी. शिर्के, त्याचप्रमाणे कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन सांघिक कार्यालय, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचा १७वा वर्धापन दिन सांघिक कार्यालय, मुंबई येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्धापन दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्युत केंद्रांना 'ब्लॅक डायमंड पुरस्कार' तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'विश्वकर्मा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सदर सत्कार सोहळा तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली तर तत्कालीन संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, तत्कालीन संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर आणि तत्कालीन संचालक (मानव संसाधन) मा.श्री. मानवेंद्र रामटेके यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. तसेच महानिर्मिती कंपनीचे सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक आणि अन्य अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

सदर पुरस्कार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व सर्व संचालक यांच्या हस्ते कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - १ व २) ह्यांनी स्वीकारले.

यामध्ये नाशिक औ.वि. केंद्राने ब्लॅक डायमंड चषक (ॲवार्ड) सन २०१८-१९ व २०१९-२० तसेच २०२०-२१ प्रथम क्रमांक मिळाल्याने सर्वत्र अभिमानास्पद बाब आहे. या बाबत नाशिक औ.वि. केंद्रातील मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले.

दिनांक १८/०६/२०२२ रोजी महानिर्मिती कंपनीतील तत्कालीन प्र. कार्यकारी संचालक श्री. राजेश मोराळे यांनी नाशिक औ.वि. केंद्रास भेटीदरम्यान ब्लॅक डायमंड चषक मुख्य अभियंता मा.श्री. भदाणे यांना सुपूर्त केला आणि सर्व अधिकारी/अभियंता/कर्मचारी व कंत्राटी कामगार यांचे अभिनंदन केले .

तसेच महानिर्मिती कंपनीद्वारे नाशिक औ.वि. केंद्रातील कार्यरत कर्मचारी (१) श्री. विलास बी. वाघ तंत्रज्ञ – १ (२) श्री. कमलाकर डी. आहिरे तंत्रज्ञ -१ (३) श्री. गजीराम ए. चारोस्कर, तंत्रज्ञ -१ यांनी सुध्दा नाशिक औ.वि. केंद्राचे नाव उंचावले. सन २०१८-१९ व २०१९-२० तसेच २०२०-२१ विश्वकर्मा ॲवार्डने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महानिर्मिती कंपनीतील तत्कालीन प्र. कार्यकारी संचालक श्री. राजेश मोराळे यांनी तीनही कर्मचाऱ्यांना सन्मानित केले

# सांघिक कार्यालयातील मानव संसाधन विभागामार्फत अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

- महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयात दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजी 'सफलता की उडान' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये श्री. जयप्रकाश काबरा ह्यांनी ३५ प्रशिक्षणार्थी (उप व्यवस्थापक व तत्सम दर्जाचे अधिकारी आणि वरिष्ठ व्यवस्थापक व तत्सम दर्जाचे अधिकारी) यांना उत्तमरित्या प्रशिक्षण दिले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत ह्यांनी महानिर्मितीच्या स्थापनातर्फे श्री. जयप्रकाश काबरा यांचे आभार मानले.
- महानिर्मिती कंपनीतर्फे 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेतून नॅशनल पार्क, बोरीवली, मुंबई येथे अधिकारी-कर्मचारी यांनी नियोजित कामामधून वेळ काढून सह्याद्री देवराई या संस्थेमार्फत 'आपण निसर्गाचे काही देणे लागतो' या उद्देशाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात अंदाजित ३० रोपांची लागवड करण्यात आली आणि आजतागायत महानिर्मिती कंपनीचे अधिकारी-कर्मचारी लागवड केलेल्या रोपांचे संवर्धन करीत आहेत. सदर कार्यक्रमास मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत यांनी सह्याद्री देवराई या संस्थेचे आभार मानले.
- महानिर्मिती कंपनीतर्फे 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेतून अधिकारी कर्मचारी यांच्याकरीता मराठी भाषेमध्ये कार्यालयीन टिप्पणी, पत्र व परिपत्रके तयार करण्याच्या कार्यपध्दती याबद्दलची कार्यशाळा सांघिक कार्यालय, धारावी येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत मुख्य लिपिक (मासं) श्री. प्रथमेश पालव यांनी या विषयाबाबतचे मार्गदर्शन दिले. सदर कार्यक्रमास मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत यांनी उपस्थित राहून मुख्य लिपिक (मासं) श्री. पालव यांनी दिलेल्या प्रशिक्षणाबद्दल त्यांचे कौतुक केले.
- महानिर्मिती कंपनी 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेतून Mind Management या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन ५ सप्टेंबर २०२२ रोजी सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे करण्यात आले. सदर कार्यशाळेत आचार्य स्वामी ध्रुव यांनी अनमोल मार्गदर्शन देऊन उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना संबोधित केले. महानिर्मिती कंपनी प्रशासनाच्या वतीने उप कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) सौ. सोनाली चुंगडे ह्यांनी आचार्य स्वामी ह्यांचे आभार मानले.
- महानिर्मिती कंपनीतर्फे श्री. अरूण ऋषी यांचे 'एक दवा निराली १५ सेकंद की ताली' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन प्रेक्षागृह, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे करण्यात आले होते. सदर कार्यशाळेकरिता महानिर्मितीचे तत्कालीन मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व सर्व संचालक तसेच कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी वर्गांनी आवर्जुन उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमात ध्यान करण्याच्या पद्धती, टाळी वाजविण्याचे फायदे, आयुर्वेदातील फायदे, Accupressure points या बद्दलची माहिती देण्यात आली. या कार्यशाळेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये निरोगी आरोग्यशैली जोपासण्याची भावना वाढीस लागली. सदरहू कार्यशाळेचे यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत आणि उप कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) सौ. सोनाली चुंगडे यांनी मोलाचे योगदान दिले.
- महानिर्मिती कंपनीतर्फे दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजी "Towards Medicine Free Life to Improve Working Efficiency & Mental Health" या विषयावर सभागृह सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे National Education या संस्थेतर्फे आयोजन करण्यात आले होते. सांघिक कार्यालयातील ५० वर्षावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन त्याबद्दलची जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने सदर प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणामध्ये औषधविरहित आयुष्य कसे जगावे ह्याविषयीचे मार्गदर्शन करण्यात आले. महानिर्मितीच्या व्यवस्थापनातर्फे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत ह्यांनी National Education संस्थेचे आभार व्यक्त केले.
- महानिर्मिती कंपनीतर्फे 'गतिमान प्रशासन - मानव संसाधन' या संकल्पनेतून सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-देयके) श्री. रणधीर कुमार पाठक व त्यांच्या विभागातील कर्मचारी यांनी कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत अथक प्रयत्नांनी १००% नामनिर्देशन केले. त्यांच्या या परिश्रमाची दखल घेत कार्यकारी संचालक (मासं) मा.श्री. भिमाशंकर मंता यांनी संपूर्ण चमूचे कौतूक केले.
- महानिर्मिती कंपनीमधील अधिकारी-कर्मचारी यांचे पदोन्नती / उच्चस्तर वेतनश्रेणीचे प्रस्ताव वेळेवर सादर करण्याकरीता गोपनीय अहवाल मुल्यांकन व शिस्तभंगाबद्दलची माहिती तात्काळ उपलब्ध व्हावी, याकरिता गतिमान प्रशासन - मानव संसाधन या संकल्पनेअंतर्गत SAP-ERP मध्ये सुविधा तयार करण्याबाबत व्यवस्थापनाने मंजुरी दिली. त्याचाच एक भाग म्हणजे गोपनीय अहवाल आणि शिस्तभंगविषयक माहिती SAP ERP मध्ये नोंदविण्याकरिता सुविधा तयार करण्यात आली. याबद्दलची माहिती देण्याकरीता SAP प्रणालीमधून गोपनीय अहवाल भरण्याची प्रक्रिया या विषयाचे प्रशिक्षण, कोराडी प्रशिक्षण विभाग तसेच नाशिक प्रशिक्षण विभाग येथे सदर कामाशी संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना देण्यात आले. सदर प्रशिक्षणाकरिता सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-गोअक) श्री. कौस्तुभ इंगवले व वरिष्ठ व्यवस्थापक (मासं-मातं) श्री. अण्णा बागडे यांनी उत्तमरित्या या प्रक्रियेबद्दल योग्य असे मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षण योग्यरित्या पार पाडण्याकरिता प्रशिक्षण विभाग, मासं-गोपनीय अहवाल कक्ष व माहिती तंत्रज्ञान विभाग ह्यांनी आपले बहुमुल्य योगदान दिले. कार्यकारी संचालक (मासं) मा.श्री. भिमाशंकर मंता यांनी हे कार्य पूर्णत्वास नेण्यास विशेष योगदान दिले.

# हिरोती

- डॉ. अतुल बनसोड,
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
कोराडी औ.वि. केंद्र (३×६६० मेगावॅट)



सामुदायिक सहभोजनाच्या वेळी सहज गंमतीने मित्र म्हणाला, "अरे आज तुझ्या भाजीत हिरोती जास्त झाली. खाताना घाम येतो आहे".

"हिरोती" शब्द हा तिखटाला समानार्थी शब्द आहे. जेव्हाही कुठे मी हा शब्द ऐकतो, माझे मन कुठल्या तरी भूतकाळातील दुपारी झालेल्या पार्टीत अलगद येऊन पोचते. जेवण दुपारी जरी असले तरी लोक सकाळपासूनच कामाला लागतात. मांसाहारी व्यक्तीला या पार्टीची विशेष आस्था असते. बहुदा आमच्या मधलाच कोणी एक सन्माननीय मटण बनवणारा असतो, त्यामुळे त्याचा मान मोठा, त्याची व त्याच्याबरोबर इतरांची सोय करणे हे या पार्टीतले दुसरे उद्दिष्ट. सर्वच आमंत्रित अगदी वेळेवर पार्टी स्थानी पोहोचतात. एकीकडे गप्पांचा फड तर दुसरीकडे गंजीबा, अगदी कौरव पांडवांच्या भावनेतून खेळ रंगलेला असतो. अर्थात, तिथे पण काही कमाई बहाद्दर असतातच, स्वयंपाक जोमात सुरु असतो तेव्हढ्यात कोणीतरी आरोळी ठोकतो, "टाक न बे हिरोती" नेमके हे शब्द माझे कान टिपतात अन् मी मनोमन हादरतो. कारण माझ्यासारख्याला ते तिखट खाणे म्हणजे आपल्या स्वयं वर केलेला अत्याचार वाटतो. व्यवस्थित सोय झाली की, भोजनाची पंगत सुरु होते. जो बनवणारा असतो तो मग पंगतीत येतो, जणू मुलीचा बाप असल्याचा आव आणून कसे जमले याची विचारपूस करतो. शुद्धी-बेशुद्धीत लोक तोंडभर तारीफ करतात, कोणीतरी तिखट कमी झाल्याची प्रतिक्रिया देतो. लगेच बनवणारा म्हणतो, "अबे, साहेब लोक आहे ना जेवणारे. म्हणून कमी टाकले". मी मात्र कोपऱ्यात घाम पुसत पाण्याबरोबर घास गिळत असतो. मनोमन निश्चय करतो, पुन्हा न येण्याचा. अर्थात, ही काही भीष्म प्रतिज्ञा नसते. कारण एक जेवण सोडले तर बाकी बऱ्याच परमानंद देणाऱ्या गोष्टी आहेत, ज्या याच पार्टीतून मिळतात. मोठ्या-मोठ्या व्यक्तींना या पार्टीने भुरळ घातली आहे. निवृत्त झालेले कोणी भेटले की, आवर्जुन कुठल्या तरी जुन्या पार्टीवर रोमांचक चर्चा होते. कुठेतरी मटण बनविणाऱ्या व्यक्तीचा विषय निघतो आणि भूतकाळ पुन्हा ताजा होतो. ही पार्टी म्हणजे निव्वळ पार्टी नसून आपापसांतील संबंध सुधारण्याकरिता एक व्यासपीठ ठरते. आपसी भेदभाव विसरून, आपले पद थोडा वेळ बाजूला ठेवून मिळून मिसळून आनंद साजरे करण्याचे हेच एकमेव माध्यम आहे, असे मला वाटते. बाकी हजारो रुपये खर्चून, कोण्या तारांकित हॉटेलात होणाऱ्या वलयांकित पार्टीला दुपारच्या पार्टीची चव नाही.

******

## कोयना जल विद्युत केंद्र संकुलात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. २६ जून २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये राजर्षी शाहू महाराज याच्या प्रतिमेस श्री. एम.एन. फडतरे - वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

या जयंती कार्यक्रमास श्री. एस.बी. शिर्के - उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) आणि कार्यालयातील पुरूष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

प्रशासकीय वृत्त

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे शासन निर्णयानुसार शनिवार, दि. ३० एप्रिल, २०१२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यात सर्वप्रथम खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या शुभहस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या कार्यक्रमात श्री. शरद भगत - उप मुख्य अभियंता (१), श्री. अरुण पेटकर - उपमुख्य अभियंता (२), श्री. अनिल काठोये - अधीक्षक अभियंता, श्री. विनोद बराटे - अतिरिक्त कार्यकारी अभियंता सी.पी.एस.), श्री. निलेश माळवे - अतिरिक्त कार्यकारी अभियंता तसेच अन्य अधिकारी, अभियंते, कर्मचारी व कामगार या प्रसंगी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. अमरजीत गोडबोले - प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) श्री. पंकज सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

दिनांक ९ सप्टेंबर २०२२ रोजी मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) मा.श्री. पंकज सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली पारस औष्णिक विद्युत केंद्रात आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत त्यांनी वीज केंद्रातील राख हाताळणी विभाग, कोळसा हाताळणी विभाग व केंद्रातील विविध समस्या जाणून घेवून प्रत्यक्षरित्या पाहणी केली व पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच वीज केंद्रातील कार्यरत संयुक्त वीज निर्मिती कृती समिती यांच्या तक्रारी जाणून घेतल्या व त्यांचे निराकरण करण्याचे आश्वासित केले.

याप्रसंगी पारस औष्णिक वीज केंद्रातील मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर, उपमुख्य अभियंता श्री. शाम पी. राठोड, अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, धनंजय पंधाडे व संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व अन्य अभियंते, अधिकारी/कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र कोराडी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र कोराडी येथे दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती तत्कालीन कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) मा.श्री. अभय हरणे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्वप्रथम कल्याण अधिकारी कु. प्रिती रामटेके यांनी प्रास्ताविक भाषणांमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याविषयी माहिती विषद केली व त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या छायाप्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. मा.श्री. हरणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषण करून उपस्थित सर्वांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास उप मुख्य अभियंता श्री. विराज चौधरी, उप-महाव्यवस्थापक (मासं) श्री. प्रकाश प्रभावत, कार्यकारी अभियंता श्री. प्रविण बुटे व सौ. चव्हाण, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री. दिवाकर देशमुख आणि कोराडी औ.वि. केंद्रातील पुरूष व महिला अधिकारी कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे वसाहतीमधील पुरूष व महिला वर्गसुध्दा यांनीसुध्दा या अभिवादनपर कार्यक्रमास उपस्थित राहून पुष्प अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. प्रिती रामटेके, कल्याण अधिकारी यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना शपथ कार्यक्रम संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना शपथ ग्रहण करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तद्नंतर मा. मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर यांनी उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी वर्गांना सद्भावना शपथ दिली.

या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा. श्री सुनील सोनपेठकर, प्रमुख उपस्थितीमध्ये उपमुख्य अभियंता श्री. शाम पी. राठोड, अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, धनंजय पंधाडे व संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गवार व अन्य अभियंते, अधिकारी-कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेढेकर यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात श्री. अरुण ऋषी यांच्या "एक दवा निराली, १५ सेकंद की ताली" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

श्री. अरुण ऋषी (स्वर्गीय) यांच्या "एक दवा निराली, १५ सेकंद की ताली" या विषयावर पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांकरिता कार्यशाळेचे आयोजन दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी करण्यात आले. श्री अरुण ऋषी (स्वर्गीय) हे आयुष्यमान भव ट्रस्ट व रिसर्च सेंटर, उज्जैन, मध्यप्रदेशचे संस्थापक असून आजतागायत १,६०० पेक्षा अधिक प्रशिक्षण वर्ग त्यांनी आयोजित केलेले आहेत. सदर प्रशिक्षण व त्यांच्या कार्यशाळेचा लाभ पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना मिळावा या उद्देशाने पारस येथे आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रम तीन टप्प्यांत घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात विद्युतनगर येथील एकविरा स्कूल, पारस येथील विद्यार्थ्यांकरिता, दुसऱ्या टप्प्यात अधिकारी व कर्मचारी या वर्गाकरिता व तिसऱ्या टप्प्यात सर्व कुटुंबियांकरिता घेण्यात आला. सदर कार्यक्रमात उत्स्फूर्तरित्या सर्वांनी भाग घेऊन अंदाजे ३०० ते ३५० सदस्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा. श्री सुनील सोनपेठकर, प्रमुख उपस्थिती म्हणून उप मुख्य अभियंता श्री. शाम राठोड, अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, श्री धनंजय पंधाडे, श्री. संजय कांबळे व प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गवार इ. मान्यवर लाभले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेढेकर यांनी केले.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचा ४८वा वर्धापन दिन विविध उपक्रमांसह उत्साहात संपन्न

"कोराडी औष्णिक वीज केंद्र हे भौगोलिकदृष्ट्या आणि नफा–तोट्याच्या दृष्टिकोनातून महानिर्मितीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. वीज उत्पादनविषयक सर्वांगाने कार्यक्षमता वाढीसाठी कार्यरत मनुष्यबळ आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी वसाहत परिसरात फ्री वायफाय सुविधा, स्विमिंग पूल, जिम्नॅशियम सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा तसेच इतर स्थानिक सोयी सुविधांसाठी मुख्य अभियंता स्तरावरून विशेष प्रयत्न करण्यात यावे", असे मत कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था–२) मा.श्री. पंकज सपाटे यांनी व्यक्त केले. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४८ व्या वर्धापन दिनाच्या समारोपीय कार्यक्रमात ते रंगमंच कोराडी येथे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कोराडी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता अभय हरणे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था–२) मा.श्री. पंकज सपाटे होते. विशेष अतिथी म्हणून कार्यकारी संचालक (माहिती व तंत्रज्ञान) मा.श्री. नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था–१) मा.श्री. गिरीश कुमरवार, मुख्य अभियंते श्री. शरद भगत, अनिल आष्टीकर, माजी मुख्य अभियंते श्री. राजकुमार तासकर, वर्धापन दिन समिती सचिव श्री. शैलेंद्र अर्जितवार, सहसचिव श्री. निलेश चरखे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी श्री. शैलेंद्र अर्जितवार यांनी अहवाल वाचन व प्रास्ताविक केले. यानंतर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी. अन्बलगन, संचालक (संचलन–प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक तथा सल्लागार (खनिकर्म) मा.श्री. दिवाकर गोखले यांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) मा.श्री. नितीन चांदूरकर यांनी आपल्या भाषणांत डिजिटल क्रांतीमुळे काम अगदी सोपे झाले आहे हे खरे. प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन असल्याने ऑनलाईन व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर गुन्हे हा अतिशय चिंतेचा विषय झाला आहे. मोबाईलवरून ॲप डाऊनलोड करतांना सहज एक्सेस देण्यात येत असल्याने डाटा सुरक्षित राहत नाही. ऑनलाईन कामकाजावर अवलंबून राहणे, सायबरविषयक नागरिकांमध्ये जागरूकतेचा अभाव, पोलीस दलाची तोकडी तांत्रिक क्षमता, तपासातील अडचणी, मोजकी सायबर स्थानके, मोबाईल ॲपची छुपी ग्राहक नीती, सायबर कायद्यातील तरतुदी, प्रभावी रेग्युलेटर नसणे, संघटित सायबर माफिया यामुळे दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढतच आहे. वीज उत्पादन क्षेत्र अतिशय संवेदनशील असल्याने डाटा सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर जागरूकता तितकीच महत्वाची असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था – २) मा.श्री. गिरीश कुमारवार म्हणाले की, मुख्यालयाच्या दृष्टीने हे केंद्र महत्वाचे असल्याने अपेक्षा वाढणे स्वाभाविक आहे. याप्रसंगी राजकुमार तासकर, अनिल आष्टीकर, शरद भगत यांनी समयोचित भाषणे केली. अध्यक्षस्थानाहून मुख्य अभियंता मा.श्री. अभय हरणे म्हणाले की, "कोराडीची एकूणच कार्यक्षमता अधिक वाढवावी लागेल त्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे गरजेचे आहे." कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचलन दिप्ती राम, आकाश थुटे यांनी तर प्रभारी कल्याण अधिकारी श्री. दिवाकर देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सकाळी पूजेला माजी मुख्य अभियंता शरदचंद्र देव हे आवर्जून उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांमध्ये बॅडमिंटन, टेबल टेनिस, ब्रिज, बुद्धिबळ, कॅरम, क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, रांगोळी, चित्रकला, हाऊसकीपिंग स्पर्धा, रक्तदान शिबिर घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सांघिक खेळांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. शिवाय इव्हेंट प्रस्तुत हिंदी–मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम सारंग जोशी, सागर मधुमटके आणि चमूने सादर केला.

या प्रसंगी उप मुख्य अभियंते सर्वश्री. विराज चौधरी, प्रफुल्ल कुटेमाटे, डॉ. अनिल काठोये, श्याम राठोड, अरुण पेठकर, अधीक्षक अभियंते सर्वश्री. अंकुर जोशी, अशोक भगत, सचिन देगवेकर, कमलेश मुनेश्वर, संतोष चंद्रमणी, राजेश अलोणे, नितीन रोकडे, मनोज देशमुख प्रभारी, डॉ.भूषण शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकेश गजभिये, उप महाव्यवस्थापक (मासं) दिवाकर देशमुख, वरिष्ठ व्यवस्थापक सुरक्षा विनायक वडोदकर तसेच कोराडी वीज केंद्राचे विभागप्रमुख अधिकारी–कर्मचारी, तंत्रज्ञ, कंत्राटी कामगार, कुटुंबीय, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते तर वर्धापन दिन आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी–सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त नागपूर कार्यालयात 'स्वच्छ भारत अभियान सप्ताह'

दि. ०२ ऑक्टोबर २०२२ या दिनाचे औचित्य साधून महानिर्मिती कंपनीतील सर्व विद्युत केंद्रे, कार्यालये व वसाहतीत महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छ भारत अभियान सप्ताह' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

त्या अनुषंगाने दि. २६ सप्टेंबर २०२२ ते दि. २ ऑक्टोबर २०२२ दरम्यान 'स्वच्छ भारत अभियान सप्ताह' श्रमदानातून उप मुख्य अभियंता (इंधन व्यवस्थापन), नागपूर या कार्यालयात राबविण्यात आला. या सप्ताहात उप मुख्य अभियंता (इंधन व्यवस्थापन), नागपूर या कार्यालयात श्रमदानातून एक तास कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त स्वच्छता अभियान राबविण्याबाबत आराखडा तयार करण्यात आला. सदर अभियाना अंतर्गत खालील बाबींचा समावेश करण्यात आला.

१) कार्यालयात वापरत नसलेल्या भंगार वस्तू तसेच जिन्यावर पडलेल्या वस्तू यांची विल्हेवाट लावण्यात आली.

२) संचलन व सुव्यवस्था विभागात वापरात नसलेल्या वस्तूंना जिन्यावर न ठेवता योग्य ठिकाणी व्यवस्थित ठेवण्यात आल्या.

३) वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्वच्छतेवर भर देण्यात आला.

४) कार्यालयात वापरेलेले जुने अनावश्यक कागदपत्रे, वृत्तपत्रे, मासिके, दैनंदिनी इत्यादींची योग्यरित्या विल्हेवाट लावण्यात आली.

५) घनकचऱ्याची सुयोग्य व शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' निमित्त 'हर घर तिरंगा' उपक्रम मोठ्या उत्सवात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पारस औष्णिक विद्युत केंद्रात दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान मुख्य कार्यालय येथे शासन निर्देशानुसार विविध उपक्रम राबविण्यात आले.

सदर उपक्रमातील 'हर घर तिरंगा' अंतर्गत वीज केंद्राद्वारे विद्युतनगर येथील प्रत्येक इमारतीतील रहिवाश्याला ध्वज फडकविण्याचे प्रतिनिधीत्व सोपविण्यात आले व सर्व इमारतीतील प्रतिनिधींनी इमारतीच्या सर्व रहिवाश्यांसह संयुक्तरित्या फडकविण्यात आले. सदर दिनी विद्युतनगर संपूर्ण तिरंगामय दिसून येत होते.

अमृत महोत्सव अंतर्गत वीज केंद्रातील प्रशासकीय इमारत व मुख्य प्रवेशद्वार येथे रोषणाई करण्यात आली. संपूर्ण प्रशासकीय इमारत व मुख्य प्रवेशद्वार येथे ध्वजाचे तीन रंगाने रोषणाई केली होते. अधिकारी / कर्मचारी व कंत्राटी कामगारांकरिता मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरले असून कर्मचाऱ्यांचे सेल्फी पॉईंट व Whatsapp व Facebook Status ह्याने रंगविण्यात आले.

दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान प्रशासकीय यंत्रणेद्वारे ध्वज नियमावलीनुसार ध्वजारोहण करण्यात आले. दि. १३ ऑगस्ट रोजी उपमुख्य अभियंता श्री. शाम राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व दि. १४ ऑगस्ट रोजी अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच स्वतंत्रता दिवशी मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर, उपमुख्य अभियंता श्री. शाम राठोड, अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, धनंजय पंधाडे, संजय कांबळे, राजेश एन. गवार यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्यामुळेच सदर कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पडण्यास यश प्राप्त झाले.

या कार्यक्रमास कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. योगेश पटीये, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. बालाजी अंबाड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (वि. सं) श्री. ताराचंद चांदेकर व कनिष्ठ अभियंता (एम.आय.एस.) श्री. सुनील सुरसे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच वीज केंद्रातील संपूर्ण अभियंते, अधिकारी-कर्मचारी व कंत्राटी कामगार यांनी उपरोक्त कार्यक्रमास भरघोस प्रतिसाद दिला व कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य केले.

## भाटघर जल विद्युत केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने जनरेटर स्टेटर बार यशस्वीरित्या बदलण्यात यश

भाटघर जल विद्युत केंद्र (१×१६ मेगावॅट संच) २२ ऑगस्ट २०२२ रोजी Y Phase CT (सीटी) फुटल्याने बंद झाले होते. सीटी बदलण्याचे काम पूर्ण झाल्यावर संच कार्यान्वित करताना स्टेटर अर्थ फॉल्ट आल्यामुळे संच कार्यान्वित करणे शक्य झाले नाही. निरीक्षणानंतर एक स्टेटर बार खराब सापडला व तो बदलणे आवश्यक असल्याचे आढळून आले. अशा प्रकारचे दुरुस्ती काम या आधी नविकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे अंतर्गत कधीही झाले नव्हते.

सहाय्यक अभियंता श्री. पी.व्ही. बोराटे यांनी त्वरित भाटघर जल विद्युत केंद्र येथील तंत्रज्ञांच्या सहकार्याने खराब स्टेटर बार बदलणे संदर्भात कार्यवाही सुरू केली. यासंदर्भात नविकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे यांनी मा. मुख्य अभियंता (नविकरणीय ऊर्जा), मुंबई यांचे मार्गदर्शनाप्रमाणे त्वरित पावले उचलून कार्यादेश देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण केली.

भाटघर जल विद्युत केंद्र व चाचणी विभाग, नविकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे यांनी संयुक्तपणे सर्व कामाची व्यवस्थित आखणी करून हे काम पूर्ण केले व दि. २७ सप्टेंबर ०२०२२ रोजी अधीक्षक अभियंता, नविकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे यांच्या उपस्थितीत संच कार्यान्वित करण्यात आला. कामाचे योग्य नियोजन व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने हे काम लवकरात लवकर पूर्ण करणे शक्य झाले.

या कौतुकास्पद कामगिरीबद्दल श्री. संजयकुमार भागवत, अधीक्षक अभियंता, नविकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे यांनी श्री. डी.बी. डोंगरे, प्रभारी कार्यकारी अभियंता, भाटघर विभागीय कार्यालय व भाटघर चमूंचे तसेच श्री. एम.एम. अभ्यंकर, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग व त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन केले.

तसेच, मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मितीचे सर्व संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच मा. मुख्य अभियंता (नविकरणीय ऊर्जा), मुंबई यांनी या कामाची दखल घेऊन विक्रमी वेळेत काम केल्याबद्दल सर्व चमूंचे कौतुक केले आहे.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात संपन्न झाला. सदर दिनासाठी जैव विविधता प्रकल्पाअंर्तगत तत्कालीन मुख्य अभियंता मा.श्री. व्ही.एस. खटारे, उप मुख्य अभियंता श्री. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. पंधाडे व श्री.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले.

सदर वृक्षारोपणासाठी कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. शेटे यांनी सर्व देशी झाडे लावण्याचे सुचवले व त्यात वेली फुलझाडे, फळझाडे, महावृक्ष, कंद असे वनवैविध्य ठेवण्यासाठी तशा प्रकारची रोपे निवडली. यासाठी वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ सौ. इंगळे, श्री. अरुण पाटील, कु. माधुरी सावजी, कु. लांडगे, श्री. शिंदे, कु. मेश्राम इत्यादींचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर पर्यावरण दिनानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात केल्या होत्या. विजेत्या स्पर्धकांना मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांच्या अध्यक्षतेखाली बक्षिस म्हणून फुलझाडे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. या बक्षिस समारंभास श्री. बुरुंगले कला व विज्ञान महाविद्यालय, शेगाव येथील प्रा.डॉ. भदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. प्रा.डॉ. भदे यांनी "Healthiness with Environment" या विषयावर पर्यावरणपूरक मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्याचे स्वागत झाल्यावर मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांनी सर्वांना पर्यावरण रक्षणाची शपथ दिली.

सदर कार्यक्रमात कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. शेटे यांनी प्रास्ताविकात पर्यावरण प्रदुषण यावर मौलिक व रंजक माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांनी अत्यंत नर्मविनोदी शैलीत सर्वसामान्यांच्या प्रती पर्यावरणाबाबत उदासीनतेवर मार्मिक कोरडे ओढले व पर्यावरण रक्षणाचे महत्व विदित केले.

कार्यक्रमाचा समारोप वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ सौ. सुनंदा इंगळे यांनी केला. या कार्यक्रमाचे नियोजन श्री. ए.एम. पाटील, कु. सावजी, सौ. ठोंबरे, श्री. शिंदे यांनी केले. सदर कार्यक्रमास उप मुख्य अभियंता श्री. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. पंधाडे, श्री. कांबळे तसेच श्री. चाकोडे, श्री. मेढेकर, श्री. गेडाम, श्री. तायडे, श्री. बोरकर व इतर विभाग प्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जल प्रक्रिया विभागातील सर्व कर्मचारी, वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

## नवनियुक्त संचालक (खनिकर्म) मा.श्री. दिवाकर गोखले यांची नागपूर तसेच पाईप कन्व्हेयर प्रकल्पाला भेट, वेकोलिचे सी.एम.डी. समवेत बैठक संपन्न

महानिर्मितीच्या संचालक (खनिकर्म) पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर श्री. दिवाकर गोखले यांनी दि. ३ व ४ नोव्हेंबर २०२२ रोजी कोल ऑफिस नागपूर आणि कोराडी औष्णिक विद्युत केंद्राला भेट देऊन अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेऊन विस्तृत चर्चा केली.

वीज उत्पादनासाठी कोळशाचा आवश्यक मात्रेसह नियमित पुरवठा व्हावा, त्याचा दर्जा चांगला रहावा आणि साठा वाढावा हा या दौऱ्यामागचा मुख्य उद्देश होता.

कोळसा प्राप्तीसाठी कसोशीने प्रयत्न करणे, अनलोडिंग एंडवर ऑगर वापरून सॅम्पलिंग करणे, लोडिंग–अनलोडिंग दोन्ही टोकांवर जी.सी.व्ही. त येणाऱ्या फरकाचा अभ्यास करण्यासाठी विशेष मोहीम राबवणे, कोराडी–खापरखेडा वीज केंद्रासाठी सिंगोरी–भानेगाव कोळसा पाईप कन्व्हेयरने सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणे, रस्ते वाहतुकीसाठी ई–सीलिंग पद्धतीची अंमलबजावणी करणे इत्यादी सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. कोळसा हाताळणी विभाग आणि कोळसा प्रयोगशाळेला देखील भेट दिली.

मे. वेस्टर्न कोलफिल्डस् लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. मनोज कुमार यांना भेटून महानिर्मितीला आवश्यक कोळसा पुरवठा व इतर विषयांवर चर्चा केली.

सदर भेटीदरम्यान प्रभारी कार्यकारी संचालक (कोल) श्री.राजेश पाटील, मुख्य अभियंते श्री.अभय हरणे, श्री.राजेश कराडे, श्री.शरद भगत, श्री.नारायण राठोड (प्रभारी), उप मुख्य अभियंते श्री.विजय बारंगे, श्री.विलास मोटघरे, श्री.विराज चौधरी तसेच संबंधित विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत येथे दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात औ.वि. केंद्रातील अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी–कर्मचारी, तंत्रज्ञ व महिला कर्मचारी उत्स्फूर्तरित्या सहभागी झाले होते.

## मा. ना.उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांचे प्रकाशगड येथे तिन्ही वीज कंपन्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन

दि २८ सप्टेंबर २०२२ रोजी मा. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांनी प्रकाशगड येथे तिन्ही वीज कंपन्यांची आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत महानिर्मितीतर्फे सादरीकरण करण्यात आले व त्यावर मा. मंत्री महोदय यांनी पुढील निर्देश दिले.

१) जुने सबक्रिटिकल संच टप्प्याटप्प्याने बंद करून तिथे नव्या अत्याधुनिक व पर्यावरणपूरक सुपर क्रिटिकल संचाची उभारणी गरजेनुसार गतिमानतेने करावी.

२) चंद्रपूर मधील इराई जलाशय येथील प्रस्तावित तरंगत्या सौर प्रकल्पाचे धर्तीवर मराठवाड्यातील जायकवाडी येथेही तसा सौर प्रकल्प उभारता येईल काय याचा अभ्यास करून त्यावर कार्यवाही करावी.

३) खात्रीशीर वीजनिर्मितीसाठी व विशेषत: शिखर मागणी च्या काळात विजेची पूर्तता करणेसाठी पंप स्टोरेज जल प्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यावर कार्यवाही करणे.

४) वीज केंद्रांच्या कामगिरीत आणखी सातत्याने सुधारणा करून वीज केंद्रातील पर्यावरण व सुरक्षितता याबाबत दक्ष राहून पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेणे.

५) सर्व विभागातील प्रलंबित सौर प्रकल्पांना गती देणे.

६) कोळसा पुरवठा दर्जेदार होईल यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे.

७) कालपरत्वे वयोमानानुसार बंद केलेल्या वीज संचांच्या जागेचा विधायक उपयोग करून त्यायोगे मालमत्ता चलनीकरणाच्या प्रक्रियेतून महानिर्मितीला वाढीव उत्पन्न स्त्रोत शोधण्यासाठी प्रयत्न करणे.

सदर बैठकीदरम्यान महानिर्मिती कंपनीचे तत्कालीन मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे, महापारेषण कंपनीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. दिनेश वाघमारे आणि महावितरण कंपनीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. विजय सिंघल आणि महानिर्मितीचे स्वतंत्र संचालक मा.श्री. विश्वास पाठक तसेच तीनही कंपनीचे अन्य संचालक उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्र येथे महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथे दि. ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एम.एन. फडतरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एस.बी. शिर्के आणि कार्यालयातील पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छ भारत अभियान सप्ताह' संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्वच्छ भारत अभियान सप्ताह मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या नेतृत्वाखाली व उपमुख्य अभियंता श्री. शाम राठोड यांचे अमूल्य मागदर्शन या संपूर्ण सप्ताहात लाभले. सदर कार्यक्रमाची रूपरेषा आखून वीज केंद्रातील स्वच्छता व सुरक्षितता व वसाहतीमधीत स्वच्छता याबाबत नियोजनबद्ध प्रणाली राबविण्यात आली.

वीज केंद्रातील सर्व विभागातील कामगार, कर्मचारी व अधिकारी यांनी स्वत:च्या विभागाची स्वच्छता करून वसाहतीमध्ये सुद्धा अतिरिक्त श्रमदान केले. सर्व विभागाची स्वच्छता व सुरक्षितता याची पडताळणीकरिता चमूंची नियुक्ती करण्यात आली, त्यामध्ये प्रमुख अधीक्षक अभियंता श्री. आर.बी. गिरी, श्री. धनंजय पंधाडे, श्री. संजय कांबळे व प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व कल्याण अधिकारी श्री. मयूर मेढेकर होते. तसेच, वसाहतीमधील सार्वजनिक स्थळी अधिकारी / कर्मचाऱ्यांनी राम मंदिर, सौदामिनी आर्केड, क्रिकेट मैदान, खुले रंगमंच, न्यू क्लब शाळा, दवाखाना इत्यादि ठिकाणी एकजुटीने श्रमदान करून 'स्वच्छ वसाहत आपली वसाहत' अंतर्गत एक आदर्श सर्वांसमोर ठेवला.

सदर उपक्रमाच्या जनजागृतीकरिता विविध ठिकाणी स्वच्छ भारत अभियान सप्ताह बॅनर लावण्यात आले. सामाजिक माध्यमातून प्रसाराकरिता Whatsapp DP, Whatsapp / Facebook Status करिता केलेल्या उपक्रमाचे फोटो अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आले व त्याचा जास्तीत जास्त प्रमाणात प्रसार करण्यात यावा, असे आव्हान करण्यात आले. जेणेकरून, या उपक्रमात इतर लोकांनी सहभागी होवून आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवावा.

वीज केंद्रातील स्वच्छता कामगार हे 'स्वच्छता दूत' म्हणून आपला वीज केंद्र स्वच्छ ठेवण्यास निरंतर कार्य करीत असतात. याकरिता मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर व उप मुख्य अभियंता श्री. शाम राठोड यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ व टी-शर्ट देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

वीज केंद्रातील कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. नितीन शेटे यांनी पर्यावरणास धोका असेलेले प्लास्टिक वापरण्यावर बंदी आणायला हवी. ही काळाची गरज असून दीर्घकालीन शाश्वत विकासाकरिता आवश्यक आहे आणि त्यासाठी झाडे लावणे व त्यांचे संवर्धन याबाबत अधिकारी-कर्मचारी व कंत्राटी कामगारांना मार्गदर्शन केले.

वीज केंद्रातील विविध संघटनेचे प्रतिनिधी प्रखरतेने या उपक्रमात सहभाग नोंदविला यामध्ये श्री. धीरज गादे, श्री. संतोष सतीगे, श्री. नागेश मुंडे, श्री. अंकुश लोखंडे, श्री. रावसाहेब जाधव, श्री. विजयकुमार दिवसे, श्री. सुनील सरपाते, श्री. शाम गुंडरे, श्री. शब्बीरखान पठाण यांचे अमूल्य योगदान मिळाले. तसेच, वीज केंद्रातील विभाग प्रमुख श्री. संतोष केंडे, श्री. राजेश भोकरे, श्री. नितीन शेटे, श्री. अतुल बोरकर, श्री. सचिन डाखोळे, श्री. निलय महाजन, श्री. हरिभाऊ मैदाड, श्री. दिवान, डॉ. फैझान खान, श्री. बालाजी अंबाड, श्री. चेतनकुमार अधम, श्री. योगेश पटीये यांचे विशेष सहकार्य लाभले.

# स्वागत

## महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधारी कंपनीच्या स्वतंत्र संचालकपदी श्री. विश्वास पाठक



ऊर्जा खात्यातील प्रदीर्घ अनुभव असलेले श्री विश्वास पाठक यांची महाराष्ट्र राज्य वीज सूत्रधारी कंपनी अंतर्गत असलेल्या महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांवर स्वतंत्र संचालक म्हणून नेमणूक झाली आहे.

मुंबई येथील महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीच्या मुख्यालयात श्री पाठक यांनी पदभार स्वीकारला. त्यांनी यापूर्वी २०१५ ते २०२० या कार्यकाळात याच पदाचा पदभार सांभाळला असून या काळात त्यांनी वीज निर्मितीची स्थापित क्षमतावाढ, भारनियमन मुक्त महाराष्ट्र यात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांनी ऊर्जा विभागाला एका विशिष्ट उंचीवर नेण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. २०१४ - २०१९ या काळात मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा विभागासाठी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तसेच त्या कार्यकाळात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत प्रत्येक जिल्हास्थानी ऊर्जा विभागाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोचाव्या म्हणून पत्रकार परिषदा घेऊन पत्रकारांशी संवाद साधला आहे. विविध वर्तमानपत्रांमध्ये आतापर्यंत त्यांचे चारशेवर लेख प्रसिध्द झाले आहेत.

श्री. पाठक हे वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवीधर असून इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाचे फेलो सदस्य तसेच कायद्यातील पदवीधर आहेत. त्यांना कायदा, व्यवस्थापन, वित्त, कॉर्पोरेट कायदा आणि उद्योग क्षेत्रातील २५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी कॉर्पोरेट कायद्यात मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणूनही सराव केला आहे. श्री. पाठक हे स्वतंत्र संचालक म्हणून विविध सूचीबद्ध आणि असूचीबद्ध कंपन्यांच्या संचालक मंडळावर कार्यरत आहेत. महाराष्ट्रासाठी व्हिजन डॉक्युमेंट कमिटीच्या अध्यक्षपदाची धुरा देखील त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली आहे.

## मा.श्री. दिवाकर गोखले महानिर्मितीचे नवे संचालक (खनिकर्म)



मा.श्री. दिवाकर गोखले यांनी नुकतेच महानिर्मितीच्या संचालक(खनिकर्म) पदाचा कार्यभार स्वीकारला. श्री. गोखले यांनी खनिकर्म शाखेची अभियांत्रिकी पदवी आणि एम.बी.ए. (एच.आर.) पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. कोल इंडियाच्या भूमिगत आणि खुल्या खदानीतील कोळसा उत्खननाच्या संचलन आणि विविध तांत्रिक कामांच्या सुमारे ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर वेकोलिच्या उमरेड जिल्हा नागपूर येथून महाव्यवस्थापक (खाणकाम) म्हणून नुकतेच ते सेवानिवृत्त झाले आहेत.

कोळसा खाण प्रकल्पासाठी वन आणि शासन यांचा समावेश असलेली जमीन संपादन करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. वेकोलिच्या वणी (उत्तर भाग), नागपूर क्षेत्र आणि उमरेड येथे क्षेत्रीय महाव्यवस्थापक म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला.

विशेष म्हणजे वेकोलिच्या उमरेड भागात फर्स्ट माईल कनेक्टिव्हिटी /सायलो प्रकल्प विकसित करण्यासाठी खाणींमधील पायाभूत सुविधांच्या विकासाचे धोरण आखण्यात त्यांची निर्णायक भूमिका होती. कोळशाच्या खाणींमध्ये जागतिक खाणकाम आणि कटिंग तंत्रज्ञान जसे कंटिन्युअस मायनर आणि सरफेस मायनरच्या अंमलबजावणीमध्ये ते निपुण आहेत.

नवकल्पना साकारण्यात त्यांचा हातखंडा असून भूमिगत खाणीच्या पृष्ठभागावर १५ एकर क्षेत्रावर इको–पार्क विकसित करण्यात त्यांची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "मन की बात'' मध्ये राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात सावनेर 'इको पार्क' ची प्रशंसा केली आहे. भारतात प्रथमच 'खाण क्षेत्र २०२० मध्ये नाविन्यपूर्ण योगदान' अंतर्गत ६व्या EPC जागतिक पुरस्कारांमध्ये कॅबिनेट मंत्र्याकडून पुरस्कार प्राप्त झाला आहे.

त्यांनी वेकोलिच्या भानेगाव ओपनकास्ट प्रकल्पात वाळूपासून वीट निर्मिती प्रकल्प सुरू केला. वाळूचा लिलाव/विक्री करून वेकोलिसाठी अतिरिक्त महसूल निर्मिती केली असून प्रधानमंत्री जन आवास योजनेसाठी नागपूर सुधार प्रन्यास समवेत वाळू करार केला.

त्यांनी एशियन मायनिंग कॉंग्रेसमध्ये तसेच राष्ट्रीय स्तरावर (IIT-BHU, NIT रायपूर, NIT नागपूर) आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वेबिनारद्वारे अनेक तांत्रिक पेपर सादर केले आहेत. २०२२ मध्ये राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित असून भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाद्वारे नागपूर क्षेत्रामध्ये क्षेत्र महाव्यवस्थापकाच्या कालावधीसाठी राष्ट्रीय सुरक्षा पुरस्कार तसेच खाणकाम क्षेत्रातील उल्लेखनीय कामाबद्दल त्यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## श्री. अरुण ऋषी यांच्या "एक दवा निराली, १५ सेकंद की ताली" या विषयावर पारस औष्णिक विद्युत केंद्रामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगाची ही छायाचित्रे.





## मुख्यालय, मुंबई येथे "हर घर तिरंगा" संकल्पनेअंतर्गत उपक्रम संपन्न





'हर घर तिरंगा' या संकल्पनेअंतर्गत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांना आवाहन करणारा उपक्रम तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचे हस्ते प्रकाशगड, मुंबई मुख्यालय येथे दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी संपन्न झाला. याप्रसंगी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मानव संसाधन) मा.श्री. मानवेंद्र रामटेके आणि संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांचेसह मुख्यालयातील सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक तसेच मुख्यालयातील अन्य अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

## मुख्यालय, मुंबई येथे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली अभियंता दिन संपन्न





प्रकाशगड, मुंबई मुख्यालय येथे दि. १२ सप्टेंबर २०२२ रोजी मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांचे अध्यक्षतेखाली अभियंता दिन संपन्न झाला. याप्रसंगी तत्कालीन संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर आणि तत्कालीन प्रभारी संचालक (वित्त) मा.श्री. डी.सी. पाटील यांचेसह मुख्यालयातील सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक तसेच मुख्यालयातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## भाटघर जल विद्युत केंद्रातील अभियंते व तंत्रज्ञांची कौतुकास्पद कामगिरी – जनरेटर स्टेटर बार यशस्वीरित्या बदलला





## पारस औष्णिक विद्युत केंद्रात गणेश उत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न





## स्वागत



मा. प्रधान सचिव (ऊर्जा) मा.श्री. दिनेश वाघमारे यांनी महानिर्मिती कंपनीचे नवनियुक्त अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांचे अभिनंदन केले.

## मे. डन आणि ब्रॅडस्ट्रीट या बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे महानिर्मितीचा (TOP PSU) - २०२२" या पुरस्काराने सन्मान



### अभिनंदन

दिनांक २९ सप्टेंबर २०२२ रोजी दिल्ली येथे मेसर्स. डन आणि ब्रॅडस्ट्रीट या बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित या कंपनीला "सार्वजनिक क्षेत्रातील सर्वोत्तम उपक्रम (TOP PSU) - २०२२" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार महानिर्मितीच्या वतीने मा. संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांनी स्वीकारला.

## महानिर्मितीचे नूतन संचालक (खनिकर्म) मा.श्री. दिवाकर गोखले यांची नागपूर कोल ऑफिस, कोराडी वीज केंद्र तसेच सिंगोरी-भानेगाव खाणीसह पाईप कन्व्हेयर प्रकल्पाला भेट









# मा. उपमुख्यमंत्री तथा मा. ऊर्जा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची प्रकाशगड येथे ऊर्जा विभागाची आढावा बैठक



तत्कालीन प्रधान सचिव (ऊर्जा)
मा. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)
मा. ना. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री
यांचे स्वागत करताना.



तत्कालीन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मा. संजय खंदारे (भा.प्र.से.)
मा. ना. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री
यांचे स्वागत करताना.

**क्षणचित्रे**





मा. उपमुख्यमंत्री तथा मा. ऊर्जा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस आढावा बैठकीमधे मार्गदर्शन करताना.

**संपादक : महेश आफळे (जनसंपर्क अधिकारी)**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड,
दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ **(खाजगी वितरणासाठी)**
**E-mail :** promahagenco@gmail.com | promahagenco1@gmail.com
**Web :** www.mahagenco.in
Printed & Published by : Shri. Mahesh Aphale of
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal**